# ओ..

# अमेरिकेचे काका...



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# संदीप शांताराम सुर्वे

लिखित

दोन अंकी नाटक

# **ओ..**

# **अमेरिकेचे काका...**

# **ओ..**

# **अमेरिकेचे काका...**

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# ओ.. अमेरिकेचे काका... (दोन अंकी नाटक)

लेखक : संदीप शांताराम सुर्वे

पत्ता- मुंबई

फ़ोन : 9987311359

मेल : sandeepsurve25@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई . .कतेहोऊ श

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई ---साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन  :७ डिसेंबर २०२०

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# मनोगत

रसिक वाचकांचं प्रेमच इतकं मोठं असतं की लेखकाची लेखणी मग अविरत लेखन करीतच राहते. कधी विनोदी, कधी गुढलेखन, कधी रोमॅन्टिक तर कधी अतिशय हलकं फुलकं असं अनेक अंगी लिखाण करणं मला आवडतं. माझ्या प्रत्येक लिखाणाला रसिकांनी आजवर जी पसंती दिली त्यामुळेच ही नवनवीन लिहिण्याची स्फूर्ती येते.

चित्रपट, मालिका, गीते लिहिताना माझ्या लेखनाची सुरुवात ज्या एकांकिका व नाटकांनी केली त्या सर्व एकांकिका व ती सर्व नाटके माझ्यासाठी अनमोल आहेत. **"यातुनच घडलो.. यातूनच बिघडलो.. म्हणूनच मित्रांनो... तुम्ही भी घडा ना.. तुम्ही बि..घडाना."**

नाटक लिहिताना व ती दिग्दर्शित करताना जे सुख मिळतं त्याची तुलना कशाशीच होऊ शकत नाही. **"माझं पहिलं प्रेम.. माझं वेड.. म्हणजे रंगभूमी..."** म्हणूनच हे हलकं फुलकं विनोदी नाट्यपुष्प आपणा नाट्यवेड्यांसाठी सादर.

लेखक : संदीप शांताराम सुर्वे.
भ्रमणध्वनी : 9987311359
Sandeepsurve25@gmail.com

# ओळख



**संदीप शांताराम सुर्वे.**

लेखक – दिग्दर्शक - गीतकार.

नेहमी काहितरी वेगळं लिहावं हिच धडपड. शाळा कॉलेजपासून या क्षेत्राची चढलेली झिंग आजही तितकीच बेभान करते आणि फक्त लिहित जातो. मुंबईमधे जन्म झाला. शिक्षण व पोटापाण्याची धडपड इथेच केली. गेली काही वर्ष शूटींग निमित्ताने देशाच्या कानाकोपर्यात जावे लागते. पण मुंबईची ओढ पुन्हा इथेच घेऊन येते. मी कोकणातला.. पण महाराष्ट्रातील विविध मराठी उपभाषा आणि त्यासोबतच हिंदी, गुजराती, तेलुगू सारख्या अनेकविध भाषांमधे लिखाण करण्याचे भाग्य माझ्या नशिबी आले त्यासाठी देवाचे आभार. कोणतेही लिखाण करताना त्या कथेतील प्रत्येक पात्र मी जगतो. त्यांच्या श्वासाशी एकरुप होतो म्हणूनच मला त्या

पात्राचा.. त्या कथेचा आनंद घेता येतो. रसिकांचे प्रेम हिच माझ्या लिखाणाची उर्जा. रसिकांनी दिलेली दाद मिळते आणि मग अजून काहितरी लिहावेसे वाटते. आपल्या आसपास घडणार्या अनेक गमती जमती मी माझ्या लिखाणात सहजतेने वापरतो आणि प्रेक्षकांना ते आवडतेदेखील. असेच आपण भरभरुन प्रेम करावे आणि असेच मी भरभरुन लिहित राहावे.

रामचंद्र सडेकर, चंद्रशेखर फणसळकर, पु.ल. देशपांडे, रत्नाकर मतकरी, सुरेश भट, राम लक्ष्मण, अशोक पत्की, संजय बेलोसे हिच या क्षेत्रातील माझी स्फुर्तीस्थाने.. माझी दैवतं. यांना मनापासून वाचलं..ऐकलं.. त्यांच्यावर प्रेम केलं म्हणूनच लेखणीशी माझं नातं जुळलं.

मी लिहिलेल्या व दिग्दर्शित केलेल्या अनेक नाटक, मालिका, वेब सिरिज तसेच चित्रपटांमधून अनेक जेष्ठ व श्रेष्ठ कलाकारांनी काम केले आहे. मी लिहिलेल्या गीतांना सुरेश वाडकर, सुदेश भोसले, साधना सरगम, शान, जावेद अली, आनंद शिंदे, वैशाली माडे, केतकी माटेगावकर, कौशिक देशपांडे, सिद्धांत सुदेश भोसले, महेश राव अश्या स्वरसम्राटांनी आपला सुमधुर आवाज दिला आहे. अजून बराच पल्ला बाकी आहे व तो गाठण्यासाठी आपली कौतुकाची थाप खूप महत्वाची.

लेखक : संदीप शांताराम सुर्वे.
भ्रमणध्वनी : 9987311359
Sandeepsurve25@gmail.com

# ओ..

# अमेरिकेचे काका...

## पात्र परिचय

नवरे : वय ५० वर्ष

नवले : वय ५० वर्ष

बाई : वय ४५ वर्ष

सुगंध : वय २२ वर्ष

सन्नी : वय २२ वर्ष

मृदुगंधा : वय २० वर्ष

मोना : वय २० वर्ष

चंद्रा : वय २० वर्ष

बंड्या : वय २५ वर्ष

तात्या : वय ५० वर्ष

नाना : वय ७५ वर्ष



# अंक पहिला

**( नवल्यांच्या घरी पाहुणे येणार असल्यामुळे घरामध्ये फारच गोंधळ चाललाय. नवलीणबाई, मुलगा सुगंध, मुलगी मृदूगंधा,मोलकरीण चंद्रा घर नीटनेटकं करत असतात. नवले गडबडीत येतात.)**

**नवले** : अहो, अहो,झालं का तुमचं. अजून घरची साफसफाईच चालू आहे का? चला आटपां लवकर, आता नवऱ्या येईल बघा.

**बाई** : अहो, नवऱ्या काय बोलताय. अमेरिकेवरून येणार आहेत ते.

**नवले** : अमेरिंकेवरून येणार म्हणून काय बायको म्हणू की काय त्याला?(हसतात.) अमेरिंकेला राहतो म्हणून काय झालं, माझा लंगोटी मित्र आहे तो.

**बाई** : इश्श्य..मुलांसमोर काहीतरीच काय बोलताय.

**नवले** : काहीतरीच कुठे. अगं लंगोटी मित्र म्हणजे अगदी जीवाभावाचा मित्र आहे माझा तो. अमेरिंकेला राहतो म्हणजे काय पंख-बिंख आले की काय त्याला. ग्रॅज्युएशनपर्यंत एकाच वर्गात होता माझ्याबरोबर. माझा पेपर डिट्टो जशाच्या तसा उतरवायचा. ग्रॅज्युएट झाल्यावर त्याच्या बापाने त्याला अमेरिकेला पाठवला आणि आमच्या बापाने आम्हांला म्युन्सिपालटीत.

**बाई** : अहो,असू दे हो .

**नवले** : असू दे काय? अण्णांनी मला त्याच्याबरोबर अमेरिंकेत पाठवला असता तर आज मी पण अमेरिकेत असतो.

**सुगंध** : बाबा मला पाठवा ना अमेरिंकेत.

**नवले** : व्हाइट हाऊसमध्ये जाऊन गोटया खेळणार आहेस. दहावीत दोनदा, बारावीत तीनदा. नापासाची यादी आहे तुझ्याजवळ. ते वारकरी काहीतरी कमी वाऱ्या करत असतील पंढरीच्या. पण तुम्ही..

**सुगंध** : आई, सांग ना बाबांना. कसे मला सारखे टोचून बोलतात ते. आता मला अभ्यासात इंटरेस्ट नाही त्यात काय माझा दोष आहे.

**नवले** : छया, तुझा कसला. तुला जन्माला घातला ना, हाच माझा खूप मोठा दोष आहे. कानसुलात वाजवीन. गप्प जा, आणि साफसफाई कर. मृदूगंधा...

**मृदूगंधा** : काय बाबा.

**नवले** : परीक्षेची तयारी कशी चाललेय तुझ्या?

**मृदूगंधा** : खूप चांगली चाललेय बाबा.

**नवले** : फायनल इअर आहे. जरा ताकतीने.

**सुगंध** : बाबांचं पण काहीतरीच हा. आता फायनल इअरचा आणि ताकतीचा काय संबंध आहे काय? कॉलेज म्हणजे काय व्यायामशाळा आहे.

**नवले** : तुझ्या वयाचा होतो ना मी, तेव्हा दोन पोरांचा बाप होतो.

**सुगंध** : काय बोलताय काय? म्हणजे आम्हांला अजून दोन भावंडं आहेत.

**नवले** : हयाला अमावस्येला जन्माला घातलंत ना, तेव्हाच मी ओळखलं होतं. हे कार्ट वाकडच असणार.

**सुगंध** : ओ बाबा, कार्ट काय बोलताय. आई बघं. तुझ्यासमोर बाबा मला कार्ट बोलतायत. कार्ट बोलतायत मला. मला बोलतायत कार्ट.

**नवले** : हयाच्या तोंडाला ना मी आता चिकटपटट्टीच लावतो. काडीचं काम करणार नाही, पण बकबक नुसती.

**बाई** : अहो, करतोय ना तो साफसफाई गप्पपणे.

**नवले** : गप्पपणे. हा एवढा बडबडला तरी गप्पपणे. म्हणजे आता बकबक काय मी करत होतो?

**बाई** : अहो, जाऊ दया ना. तुम्ही कशाला त्याच्या नादाला लागताय.

**सुगंध** : आई, काय पण काय बोलतेयसं. नादाला लागायला मी काय तमाशेवाली बाई आहे काय?

**नवले** : ऐकलंस. तुझं कुक्कुलं बाळं काय म्हणालं ते. तमाशेवाली बाई नादाला लावते, हे हयाच्या बापाला माहीत नव्हतं. पण हयाला माहीतेय.

**सुगंध** : आता एवढी साधी गोष्ट तुम्हांला माहीत नाही, यात काय माझा दोष आहे काय? (नवले झाडू घेऊन त्याच्या मागे धावतात.)

**नवले** : थांब. तुला ना आता मी सरळंच करतो.

**बाई** : अहो, धावताय काय त्याच्या मागनं. पायबिय सरकला तर नको ते होऊन बसेल.(सुगंध जिना चढून बंगल्याच्या वरच्या मजल्यावर पळतो. मागून नवले पळतात.)

**मृदूगंधा** : आई, आता दादाचं काही खरं नाही बघ.

**बाई** : चंद्रे,उरलेली साफसफाई पटकन कर.आणिं स्वयंपाकाचं बघ. मी हयांना बघते.( ती जिन्याजवळ जाते. वरून सुगंध धावत येतो व दरवाज्यातून बाहेर

पळतो. मागून नवले झाडू घेऊन दरवाज्याजवळ जातात. इतक्यात समोरून बंडया दरवाज्यातून उडी मारून आत येतो.)

**बंडया** : नवलेकाका मी आलो. डॅन्टडॅन्ड.

**नवले** : आलात. या.. आत या. हयांना बसायला दया. आणि जरा कॅलेंडर बघा. आज नक्कीच अमावस्या असणार. बंडोपंत डॅन्टडॅन्ड. तुमच्यामागोमाग तुमचे पिताश्री नाय आले ते अजून.

**तात्या** : (हसत येतात.) आलो, आलो मी पण आलो. दोघं एकत्रच निघालो बंगल्यातून. पण आमचे बंडोपंत जाम जोरात धावतात ना. म्हणून माझ्यापुढे आले.

**नवले** : आलं लक्षात माझ्या. बसां बसा जरा. दमला असाल. चंद्रे पाणी पाज यांना.

**तात्या** : (उठून) चंद्रा हाय काय घरात?

**नवले** : नको चंद्रे तू नको आणूस पाणी, मीच येतो पाणी न्यायला.

**तात्या** : कशाला ,कशाला. तुम्ही कशाला.तिलाच येऊ दे नायतर मीच जातो ना आपला आत.

**बंडया** : आयला काय सही आयडीया हाय. मी पण येतो आत.

**नवले** : आत काय गावजेवण वाढलय ? बसा इथेच.

**तात्या** : आपल्याला काय. बसा तर बसा.

**बंडया** : बसायला आपल्या बापाचं काय जातय.

**नवले** : कार्ट एकदम बापावरंच गेलंय. काय घेणार?

**तात्या** : चंद्रेच्या हातचं पाणी.

**नवले** : उगाच विचारलं. चंद्रे आण पाणी आण आणि पाज यांना पाणी. नायतर गेलेबिले तर आत्मा तडफडायचा यांचा.( चंद्रा पाणी घेऊन येते.

तात्यांना देते. तात्या व बंडया दोघेही तिच्या हातातला ग्लास घ्यायला जातात. चंद्रा लाजते.) स्पर्धा नका लावू आपापसात. एकेकानेच घ्या पाण्याचा ग्लास. दोन ग्लास पाणी आणलंय तिनं. पूर्ण खानदानाच अमावस्येचा जन्म असणार. झालं का पाणी पिऊन? चहा नाही आहे तो, थांबत, थांबत प्यायला.(दोघे पाणी पितात. चंद्रा ग्लास घेऊन निघून जाते.) गेली ती. आता वेळ असेल तर जरा माझ्याकडे बघा. बाई तुम्ही आणि मृदूगंधा जेवणाकडे बघा. मी जरा यांच्याकडे बघतो.( दोघी किचनमध्ये जातात.) काय काम काढलंत सकाळसकाळ.

तात्या : आपलं ते विचारायला आलो होतो.

नवले : ते विचारायला आला होतात होय.

बंड्या : हा ....

नवले : ते म्हणजे?

तात्या : अहो आज पाहुणे येणार आहेत ना अमेरिकेहून.

नवले : म्हणजे, तुम्हाला पण कळलं, नवऱ्या येणार ते.

बंड्या : नवले काका, मी डिटेक्टिव्ह हाय ना, करमचंद डॅन्टडॅग.

तात्या : म्हणूनच पळत पळत आलो. अमेरिकेचं विमान भारतासारखं उशीरा थोडंच येणार, एकवेळ लवकर येईल.

बंड्या : म्हणूनच लवकर आलो. हो की नाही तात्या डॅन्टडॅग.

नवले : तुमच्या ह्या डॅन्टडॅगला आवरा नायतर आमच्या घरातली एखादी वस्तू फोडायचा आणि अजून अमेरिकेवाले नाय आलेयत. आले ना की मी सांगतो तुम्हाला.

तात्या : पण तुम्ही त्यांना आणायला नाय गेलात?

नवले : कुठे अमेरिकेला.

बंड्या : आयला अमेरिकेला. मी पन येऊ काय तुमच्याबरोबर.

नवले : अमेरिका काय नाक्यावरती आहे? त्या लोकांना माझं घर माहितेय. तुम्ही जा आता ते आले ना की त्यांना घेऊन येतो मी तुमच्या घरी.

बंड्या : तात्या, घर बोलतात. आपला तर बंगला हाय ना.

तात्या : तर, नवले आमचं घर थोडीच आहे. आमचा तर बंगला आहे.

नवले : तात्या, तुम्ही या आता. मला थोडी काम आहेत.

बंड्या : नवलेकाका, आम्ही तर केव्हाच आलोय. हो की नाही तात्या. डॅन्टडॅग.

तात्या : हो आणि आम्हाला अजिबात काम नाहीत, आम्ही श्रीमंत आहोत ना. श्रीमंत लोक बसूनच खातात.

नवले : म्हणजे गरीब लोक उभे राहून खातात काय? तरी बोललो. मंत्र्यांच्या मुलांच्या लग्नात ते लोक उभं राहून का जेवतात?

तात्या : मगं, आम्ही थोडी गरीब आहोत.

नवले : ओ माहितेय मला तुम्ही किती श्रीमंत आहात ते या आता.

बंड्या : नवलेकाका, तुम्ही शाळेत जायचा काय हो?

नवले : हो जायचो, पण तू हे का विचारतोस?

**बंडया** : मग, मराठीच्या पिरीयडला बसायचात काय?

**नवले** : बसायचो म्हणजे बसावच लागायचं. मराठीच्या बाईंएवढी चिकनी बाई दुसरी शाळेत कोण नव्हतीच.

**तात्या** : काय?

**नवले** : चांगलं शिकवणारी बाई म्हणालो मी. पण बंडया, तू हे का विचारतोयस?

**बंडया** : तुम्हांला या आणि जा मधला फरकच कळत नाय म्हणून.( बंडया पळतो. नवले त्याच्या मागून धावत जातात. तात्या नवल्यांच्या मागून जातात. तिघेही दरवाजातून बाहेर जातात. बाई किचनमधून बाहेर येतात.)

**बाई** : अगं बाई, कुठे गेले हे. तात्याबरोबर गेले की काय?(सुगंध आत येतो.)

**सुगंध** : आई, बाबा त्या बंडयाच्या मागून का धावतायत गं? मघाशी माझ्यामागे आता त्याच्यामागे, काय मॅरॅथॉनला उतरतायत वाटत.

**बाई** : गप्प बस, स्वत:च्या बाबांबदद्ल कायपण बोलायला तूला लाज नाही वाटंत.

**सुगंध** : आई तू पण ना,बाबांची बायको म्हणून एकदम शोभतेस बघ.(बाई त्याचा कान पकडतात.)

**बाई** : आता गप्प वर जा, आणि व्यवस्थित कपडे घालून ये. ते लोक येतील आता.(सुगंध जातो.) मृदूगंधा (मृदूगंधा येते.) तू पण बदलतेस कपडे?

**मृदूगंधा** : अगं चांगले आहेत हे कपडे. जुने थोडीच आहेत,आणि बाबांचे मित्रच येतायत ना.

**बाई** : तसं नाही गं. अमेरिकेहून येणार ते. किती वर्षांनी आपल्या देशात येतायत. मुलं पण येतायत त्यांची. तुमच्या दोघांएवढीच आहेत. तुझ्या बाबांचे खूप जवळचे मित्र आहेत ते.

**मृदूगंधा** : माहीतेय गं मला. मी काकांशी बऱ्याचदा बोललेय फोनवर. तू पण कितीवेळा बोललेयस पण काय गं, तू अजून त्यांना पाहिंलंस नाहींस ना.

**बाई** : तुझ्या बाबांच्या बरोबरचा तरुणपणीचा त्यांचा फोटो पाहिंला होता. आता देवाला ठाऊक कसे दिंसत असतील. (दरवाजाची बेल वाजते.)

**मृदूगंधा** : थांब आई, मी पहाते कोण आहे ते.

**बाई** : अगं दुसरं कोण. तुझे बाबाच असतील. (मृदूगंधा जाऊन दरवाजा उघडते. मि. नवरे सुटाबूटात आत येतात.)

**नवरे** : हॅलो एवरीबडी, आय एम मि. नारायण नामदेव नवरे. ओ..हो.. वहीनी ना तुम्ही? आणि ही आमची मृदूगंधा. राईट? नवल्या कुठाय? मूर्खाला सांगितलं

होतं मी, की मला न्यायला येऊ नकोस. आणि हा खरंच मला न्यायला आला नाही. आणि हरामखोर म्हणतो, मी खास दोस्त आहे. ओ..सॉरी. शिवी दिली मी. पण काय आहे ना वहीनी, अहो अमेरिकेत शिव्या दयायला मिळतच नाहीत ना. आता थोडे दिवस का होईना, मनोसोक्त शिव्या देऊ शकतो. तुम्हांला सांगतो. नवल्या आणि मी आम्ही दोघं अश्या काय शिव्या दयायचो ना, ज्या कधी कोणाच्या बापानं ऐकल्या पण नसतील. पाजी, हरामखोर, हलकट, तेलकट, तुपकट, रताळया, नरसाळया, माकडतोंडया, चिपाडया..(सुगंध येतो.)

**सुगंध** : वा,वा, क्या बात है? ढेपळया, खरकटया, खरमाटया. हं, आपल्याकडे पण शिव्यांचा स्टॉक आहे हं .

**बाई** : सुगंध गाढवा अरे कोणासमोर बोलतोस महिंतेय.

**नवरे** : जस्ट अ मिनीट (सुगंधजवळ येतात त्याला एक राऊंड मारतात.) सुगंध निरंजन नवले ओऽऽऽहो किती हँन्डसम झालाय पोरगा.

**सुगंध** : म्हणजे तुम्ही अमेरिकेचे काका?

**नवरे** : अरे मी तुझ्या बापाचा मित्र पण तु एकदम स्मार्ट आहेस हा.नशीब बापावर नाय गेलास.( नवले आत येतात.)

**नवले** : नवऱ्या..तु आलास.

**नवरे** : खरकटया..साल्या शंभर वर्ष जगशील बघ.

**नवले** : खरकटया?

**नवरे** : मग,मुंबईत उतरल्या उतरल्या एक झकास नवी कोरी शिंवी शिंकलो की नाही.

**नवले** : (प्रश्नार्थक चेहऱ्याने) कुणी शिंकवीली ही शिंवी तुला?

**नवरे** : अरे तुझ्या चिरंजीवाने.

**नवले** : काय? हा माझी आब्रू लवकरच वेशीवर टांगणार आहे.( सुगंधला मारायला जातात.)

**नवरे** : श्रध्दा..(नवले जागीच थांबतात. आणि नवरेंकडे पाहतात.) श्रध्दा, सबुरी घे जरा. कॉलेजात असताना कशी घ्यायचास श्रध्दा आणि सबुरी. (नवले नवरेंच्याजवळ येऊन कानात बोलतात.)

**नवले** : साल्या, न्यूयॉर्कहून मुंबईला माझ्या कॉलेजच्या भानगडी बाहेर काढायला आलायस?

**सुगंध** : भानगडी?

**नवले** : ऐकलानं. हा का माझ्या घरात जन्माला आला? हा पोरगा नाही माझा पूर्वाजन्मीचा वैरी आहे. काय तिखट कान आहेत याचे.

**नवरे** : साल्या, जळतोस काय पोरग्यावर. पण एकदम डॅशिंग आहे हा आमचा सुगंध.

**बाई** : पण भावोजी तुमची मुलं का नाही आली? ती पण येणार होती ना.

**नवरे** : येणार होती म्हणजे. आलेयत ना माझ्याबरोबर. ओ.., अरे त्यांना बाहेरच उभं केलंय मी.

**नवले** : म्हणजे, बाहेर गेटजवळ उभी आहेत ती तुझी मुलं? पोरांना गेटवर उभं करून तू आत आलास. आता घालू का तूला शिव्या.

**नवरे** : थांब, त्यांना आणतो मी आत.

**नवले** : गप्प बस जाऊन त्या सोफ्यावर. मीच जाऊन आणतो पोरांना.

**नवरे** : नो प्राब्लेम प्लीज. आणि हो, मी बाहेर गेल्या-गेल्या माझी बदनामी करायला लागू नकोस.

**नवरे** : तू स्वत:ला अमिताभ बच्चन समझतोस काय रे? अरे बदनामी कोणाची होते ज्याचं कायतरी नाव असतं माझ्यासारखं. तूला विचारतंय कोण रे.

**सुगंध** : (मोठयाने हसतो.) आमच्या एरीयातले सगळेच जण बाबांची खेचत असतात, माझ्यासकट.

**नवले** : बापाचीच भादरतोयस, बाई याला का जन्माला घातलंत हो.(मि. नवरे मोठयाने हसतात.)

**नवरे** : टाइमिंग. पोऱ्याचा सेन्स ऑफ हयुमर जबरदस्त आहे बघ. माणसांची पारखं आहे बघ याला.

**नवले** : म्हणजे तो माझी काढतोय, ती बरोबर काढतोय. असं वाटतंय तुला. नवऱ्या, याच्यावर तुझी अमेरिकेपासून इथपर्यंत काळी छाया पडली असणार.

**बाई** : अहो, मुलांना आधी आत घेऊन या. आणि मग दोघंजण बसून आरामात भांडत बसा. आम्हांला जेवणाची तयारी करायचेय. एवढया दूरच्या प्रवासाहून आलेयत. थकले असतील ते.

**नवले** : थकले असतील. थकायला हा अमेरिकेहून इथं उडत उडत आलाय की महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळाच्या लाल डब्यातून आलाय. प्लेननं आलाय प्लेननं. एअर हॉस्टेसना बघत बघत.

**नवरे** : नवल्या स्वत:वरून दूसऱ्याची कधी पारख करू नये माणसानं.

**सुगंध** : आयला काका, काय परफेक्ट बोललात.

**नवले** : तरी बोललो, हा गप्प कसा बसला. थांब, तुझ्या पाठीतना आता धपकाच घालतो.(नवले सुगंधच्या मागे धावतात. सुगंध धावत जाऊन बाहेर जायला दरवाजा उघडतो. दरवाजात मि. नवरेची दोन्ही मुलं उभी असतात. नवले सुगंधला मागे खेचतात. अरे तुम्ही दोघं या ना आत. आम्ही दोघं तुम्हांला आणायलाच बाहेर येत होतो. धावत-धावत. मी सुगंधला म्हंटलं आपण घरातूनच धावत जाऊन दोघांना घरात घेऊन येऊया. या आत या.

**नवरे** : नवल्या,साल्या.शिष्टाचार वगैरे काय दाखवतोयस. अरे त्यांना पण पळव. जसं सुगंधला पळवतोस. नायतर डोक्यावर चढून बसतील ती पण तुझ्या.

**सुगंध** : काय पण काय काका,मी बाबांच्या डोकयावर चढून बसलो ना तर बाबांचे उरले सुरले केस पण उडून जातील.

**नवले** : बोलला परत.

**नवरे** : सनी,मोना इकडं या. मी तुमची सर्वांबरोबर ओळख करून देतो. हे तुमचे नवलेकाका. तुमच्या बापाचे लंगोटीमित्र. जबरदस्त टॅलेन्टेड माणूस.

**नवले** : चांगलं बोलतोयस. की काढतोयस माझी.

**नवरे** : झालं. तुझ्याबदद्‌ल चांगलं बोललो, तरी बोलतोयस काढतोयस काय माझी. म्हणजे तुलाच तुझ्याबदद्‌ल शंका आहे. मग सुगंध तुझ्याबदद्‌ल बरोबरच बोलतो.

**नवले** : काय काय बोलला हा कार्टा.

**सुगंध** : ओ बाबा कार्टा काय बोलताय? सगळयांसमोर काय इज्जत काढताय.

**नवले** : अरे मेल्या इज्जत जॅकी श्रॉफची तुझी कसली आलेय इज्जत.

**नवरे** : नवल्या थोडा वेळ शांत बसशील तर दोघांना तुझ्या फॅमिलीची ओळख करून देतो. या आमच्या वहीनी, ही आमची मृदूगंधा, आणि हा वंशाचा दिवा. सर्वात लहान, सर्वांचा लाडका सुगंध.

**नवले** : (हसतात.) दिवा, वंशाचा दिवा. अरे झिरोचा बल्ब आहे तो.

**सुगंध** : ओ बाबा.

**नवले** : गप्प बस आता. थोबाड फोडीन नायतर.

**नवरे** : वहीनी, हे दोघे चोवीस तास असेच भांडत असतात की काय? सुगंध, आमच्या सनीशी दोस्ती करणार की नाय?

**सुगंध** : हो ना, हे काय विचारणं झालं.

**नवले** : त्याला पण स्वत:सारखं बिघडवणार की नाय?

**सुगंध** : हो ना, हे काय विचारणं झालं.

**नवले** : बघितलंस. नवऱ्या तुला एक दिवस पश्चाताप होईल. सनीला याच्यापासून लांब ठेव.

**नवरे** : गप रे नवल्या. साल्या तू आमच्या सुगंधच्या मागे आंघोळ करूनच लागलायस बघ. सुगंध ये, तुझी ओळख करून देतो.हा माझा मुलगा सनी.

**सनी** : हाय.

**नवरे** : आणिं ही माझी डॉटर मोना.

**मोना** : हाय.

**नवले** : सनी मुलगा आणिं मोना डॉटर.

**नवरे** : चिंपाडया, तुझी चुका काढायची सवय अजून गेली नाही हां.अरे अमेरिकेत सतत इंग्लिशमध्येच बोलाव लागतं.म्हणूनच मराठीत बोलताना एखादा शब्द येतो इंग्लिशचा.पण घरी मात्र सगळयांना ताकीद देऊन ठेवली आहे मराठीतूनच बोलायचं.

**बाई** : अगं बाई,म्हणजे सनी आणिं मोनाला मराठी येतं?

**नवरे** : अगदी चांगलं मराठी बोलता येतं.

**सुगंध** : बरं झालं माझं एक टेंन्शन कमी झालं.

**नवरे** : कसलं टेंन्शन रे?

**नवले** : इंग्लिशच्या नावानं बोंब आहे ना त्याची.

**बाई** : अहो आता बडबड बंद करा. किती वेळ झाला यांना येऊन. अजून बसले नाहीत की पाणी प्यायले नाहीत. भाऊजी यांचं हे दिवसभर असंच चालू राहणार. तुम्ही बसा. सनी, मोना तुम्ही पण बसा. चंद्रे अगं पाणी आण. मृदूगंधा जा काहीतरी फराळाचं घेऊन ये बघू. दोन्ही मुलं अगदी नक्षत्रासारखी सुंदर आहेत हो.रात्री दोघांची दृष्टच काढून टाकते.

**नवरे** : (हसतात.) वहीनी, अहो इथल्या परंपरा त्यांना फारश्या माहीत नाहीत. बघूया काय गंमत होते दृष्ट काढतना.

**सुगंध** : आयला परंपरा, विसरलोच. काका पाया पडतो.

**नवले** : पाहीलीस, आमची परंपरा. लेट करंट म्युन्सिपालटी.

**नवरे** : आता बापच म्युन्सिपालटीत कामाला असल्यावर बापाची परंपरा मुलानं जपायला नको काय?( चंद्रा आणि मृदूगंधा पाणी व फराळ घेऊन येतात.)

**नवले** : नवऱ्या सारखा रिबाँड मारून मलाच होलमध्ये टाकतोस काय? स्वत:ला काय कॅरम चॅम्पियन समजतोस?

**नवरे** : ए, समजतोस म्हणजे काय? होतोच मी कॅरम चॅम्पियन. आठवतंय ना. तू आणि श्रध्दा माझी फायनल बघायला आला होतात.

**नवले** : (हळूच बाजूला येऊन) श्रध्दाचं नाव घेऊ नकोस.

**सुगंध** : श्रध्दा, बाबा ही श्रध्दा कोण?

**नवले** : श्रध्दा. म्हणजे श्रध्दा. मी आणि माझी कॅरमवर असलेली श्रध्दा. मी आणि श्रध्दा. श्रध्दा आणि मी.

**नवरे** : सोबत कॅरम होताचं. नवल्या,मेल्या सबुरीने घे. नायतर तोंडावरच आपटशील.

**सुगंध** : पण काका श्रध्दा?

**नवले** : (भडकतात.) तोंड बंद कर आता नायतर तुझ्या कानाखालीच अख्खी श्रध्दा काढेन साठयांची.

**बाई** : साठयांची?

**नवले** : साठवलेली. माझ्या मनात साठलेली श्रध्दा हयाच्या कानाखाली वाजवायची.

**नवरे** : नवल्या, तू तिथं उभा राहा. सारखा आपला पोराच्या मागे धावतोयस.किती गरीब आहे आमचा सुगंध.

**नवले** : हा आणि गरीब. अरे हा जन्माला आल्यापासून हयाचा बाप गरीब झालाय. गेल्या जन्मीची पापं फेडतोय मी हयाला जन्माला घालून.

**सुगंध** : मग मी थोडी सांगितलं होतं तुम्हांला गेल्या जन्मी पापं करा म्हणून.

**नवले** : पाहीलंस, हे कार्ट किती आगाऊ आहे ते.

**सुगंध** : बाबा परत कार्ट म्हणालात.

**नवरे** : अरे बाबांनो, शांत बसा जरा. माझं ना डोकं दुखायला लागलय.

**बाई** : भाऊजी तुम्ही पाणी प्या आधी. आणि सुगंध तू सनीला घेऊन जा तूझ्या रूममध्ये.आणि मृदूगंधा तू मोनाला. सनी, मोना.यांच्या रूममध्ये रहाल ना.आमच्या घरात फक्त चारच बेडरूम आहेत.मला माहीतेय, तुमचं अमेरीकेचं घर म्हणजे फार मोठी हवेली आहे.(तिघे पाणी पितात.) सनी,

मोना.फराळ घ्या. भाऊजी तुम्ही पण घ्या ना. हा चिवडा बाजारातला नाही काही. आमच्या मृदूगंधानं केलाय.

**मोना** : वॉव..( चिवडा खात) इट्स रिअली डिलिशियस. मृदूगंधा, राईट. हा चिवडा खरंच तुझ्या नावासारखाच सुपर्ब आहे.

**सुगंध** : आयला काका, तुमचं इंग्लिश आणि मराठी दोन्ही पावरफुल आहे.

**नवले** : हयाच्या इंग्लिश आणि मराठी दोन्हीची पावरगुल आहे.

**सुगंध** : हो.

**नवले** : पाहीलंस हो म्हणतोय.

**सुगंध** : बाबा.

**बाई** : झालं तुमचं पुन्हा सुरू. चला तुम्ही लोकं थोडं फ्रेश होऊन घ्या आणि गरमागरम जेऊन घ्या पाहू. सुगंध जा सनीला घेऊन. आणि मोना तूही मृदूगंधा बरोबर जा. ( चौघे जातात.) अहो तूम्ही काय ठाण मारुन बसलायत. त्यांना फ्रेश व्हायचय जा त्यांना घेऊन (दोघे जातात.)

**नवले** : हो,हो चल रे नवऱ्या (दोघे जातात.)

**बाई** : चंद्रे इथली सगळी आवरा आवर कर आणि मला आत मदत करायला चल.

**चंद्रा** : हा बाई,बाई हे साहेब अमेरीकेतून आलेत ना.

**बाई** : हो,पण का गं. तू का विचारतेस.

**चंद्रा** : आसचं आपलं. एवढे मोठे माणूस आसूणपण आपल्या साहेबांचे जानी दोस्त आहेत. जरा पण मोठेपना नाय.नायतर एकेक लोक खिशात नसते दमडी आनी चमकावून दाखवतात चमडी.

**बाई** : कसल्या गं हया तूझ्या म्हणी,चल कामं पडलेयत सगळी.

**(सुगंध सनीला व मृदूगंधा मोनाला आपल्या बेडरुममध्ये नेते.दोन्ही बेडरुमचे दिवे लागतात.)**

**सुगंध** : सनी ये बस. बी कम्फरटेबल. आपलचं घर आहे असचं समज.आपले दोघांचे बाबा चांगले मित्र आहेत.मग आपण पण चांगले मित्र होऊ शकतो.हो की नाही.

**सनी** : एस व्हाय नॉट आजपासून आपण खास मित्र (दोघे एकमेकांशी हात मिळवीतात.)

**सुगंध** : कशी आहे अमेरिका?

**सनी** : कशी म्हणजे?

**सुगंध** : कशी म्हणजे बरी आहे ना ,सगळं काही जागेवर आहे ना?

**सनी** : आम्ही इंडियाला यायला निघेपर्यंत तरी व्यवस्थित होतं.नंतर काय **प्रॉब्लेम** झाला असेल तर माहित नाही.

**मोना** : मृदूगंधा आमच्या डॅडींना नुसतं क्रेझ आहे इंडियाचं. न्यूजमध्ये इंडियाची एखादी गोष्ट इकडची तिकडे पाहीली की अख्खं घर डोक्यावर घेतात.

**मृदूगंधा** : काकांचं फार प्रेम आहे आपल्या देशावर.

**मोना** : फक्त देशावरच नाही काही नवलेकाकांवर **देखील.** अगं लहानपणापासून आतापर्यंत नवलेकाकांचं नाव डॅडींच्या तोंडी आलं नाही असा एकही दिवस आम्हाला आठवत नाही. एक सांगू मृदूगंधा आमची मम्मा आमच्या लहानपणीच आम्हाला सोडून गेली पण डॅडींनी मम्माची कमी कधीच भासू दिली नाही.

**मृदूगंधा** : अमेरिकेला राहून सुध्दा काकांना कधीच लग्न करावसं वाटलं नाही.

**सनी** : अमेरिकेला जाऊन सगळे बदलतात. पण डॅड, नो वे. दूसरी मम्मा आली आणि तिने जर आम्हांला त्रास दिला तर म्हणून डॅडींनी लग्न केलं नाही. घरी मराठीतूनच बोलायचं यापलीकडे दूसरी कोणतीही बंधन डॅडींनी घातली नाहीत.

**सुगंध** : अमेरिकेला कॉलेजात खूप मजा येत असेल नाही?

**सनी** : येते ना. का इथल्या कॉलेजात नाही येत मजा?

**सुगंध** : कसल्या, सगळया साल्या चिल्लर पोरी.. झगामगा आणि माझ्याकडे बघा. तिकडे सगळया गोऱ्यागोमटया असतील नाही?

**सनी** : निगरो पण आहेत ना. तिकडे कसं सगळं फ्री आहे.

**सुगंध** : फ्री?

**सनी** : फ्री म्हणजे बंधनमुक्त.

**सुगंध** : आमच्या इथं सध्या कॉलेजातपण पोरींच्या कपडयांवर बंधन टाकलेयत. साले जाम वांदे करून टाकलेयत आमचे. तिकडे पोरी काय काय घालतात.

**सनी** : काय काय घालतात म्हणजे? अरे कपडे घालतात.

**सुगंध** : ते माहीतेय रे. नाहीतर काय अशाच फिरतील होय. अरे किती तोकडे घालतात कपडे?

**सनी** : जेवढं काही त्यांना दाखवावंसं वाटतं त्याप्रमाणे त्या कपडे घालतात.

**सुगंध** : काय बोलतोस काय? ए सनी, तुझी तर तिकडे चंगळच आहे ना.

**सनी** : चंगळ म्हणजे?

**सुगंध** : अरे चंगळ,चंगळ म्हणजे. आता कसं सांगू तूला. अरे धमाल, धमाल.

**सनी** : अरे त्या कमी कपडे घालतात. त्यात माझी कसली आलेय धमाल.

**सुगंध** : ए तिथे एका एका पोरीचे किती बॉयफ्रेंड असतील नाही.

**मोना** : बॉयफ्रेंड वगैरे हया तिथल्या कॉमन गोष्टी आहेत. त्यांच्याशी फ्रेंडशिप किती लिमिटमध्ये ठेवायची हे आपण ठरवायचं असतं. तूझा बॉयफ्रेंड वगैरे नसेलच नाही.

**मृदूगंधा** : तूला कसं माहीत.

**मोना** : जी मुलगी टेन्थ, टवेल्थला मेरीटमध्ये येते. तिचं आता फायनल इअर चालू आहे. तिच्याकडे स्टडीजशिवाय दूसऱ्या गोष्टीसाठी वेळच कुठे असेल.

**मृदूगंधा** : बाबांची खूप इच्छा आहे मी डॉक्टर व्हावं म्हणून.

**मोना** : ए तू डॉक्टर झालीस ना की आमच्याकडे ये रहायला. अमेरिकेला ओ.के.

**सुगंध** : काय बोलतोस काय? मी आणि अमेरिकेला तू बोल फक्त कधी जायचं ते.मी एका पायावर लंगडी घालत अमेरिकेला येईन.

**सनी** : पासपोर्ट आहे ना तूझ्याकडे.

**सुगंध** : पासपोर्ट. अरे पासपोर्ट साईझचा फोटोपण नाहिए माझ्याकडे.आमचे बाबा ना एकदम चिकट आहेत बघ. फोटो काढायचंय म्हणून सांगितलं तर दहावीचीच निगेटिव्ह घेऊन जातात. आणि तोच तोच फोटो आणतात.त्यांच्या मित्राची फोटोलॅब आहे ना.

**सनी** : अरे पण पासपोर्टशिवाय अमेरिकेला येता येणार नाही तुला.

**सुगंध** : सनी अमेरिकेसाठी मी पासपोर्ट काय फोटोपास पण बनविन. पण काही करुन मला अमेरिकेला जायचय.तिथे गेल्यावर मी सपूर्ण अमेरिका फिरेन. शांती देवतेला बघेन. वर्ल्ड ट्रेड सेंटर बघेन.

**सनी** : वर्ल्ड ट्रेड सेंटर पाडलं लादेननं.

**सुगंध** : त्याच्या आयला लादेनच्या मी बघायच्या आत का पडलं.बरं ती वर्ल्ड ट्रेड सेंटरची जागातरी बघेन.आणि इमॅजिन करेन की वर्ल्ड ट्रेड सेंटरची इमारत किती मोठी असेल.

**(बाई किचनमधून हॉलमध्ये येतात.)**

**बाई** : सुगंध, मृदूगंधा चला लवकर सनी,मोनाला जेवायला घेऊन या.जेवण तयार आहे. अहो ऐकलं का? (नवले व नवरे येतात.)

**नवले** : काय झालं?

**बाई** : जेवण तयार होत आलयं लवकर हात धुऊन घ्या. मग मी वाढायला घेते.

**नवरे** : वहिनी,मूलं कुठायत?

**मोना** : डॅडी आम्ही इथं आहोत माझी आणि मृदूगंधाची चांगली मैत्री झालीय.

**सुगंध** : आणि आमची दोघांची सुध्दा कटटर.

**नवले** : ओ कटटर हात खाली करा,आणि गिळायला चला. (बेल वाजते.)

**बाई** : आता कोण आलं.सुगंध बघ जरा.( सुगंध दरवाजा उघडतो बंडया उडी मारत आत येतो.)

**बंडया** : नवलेकाका मी आलो. डॅन्टडॅन्ड.

**नवरे** : नवल्या हा **छोटा जवान** कोण रे?

**बंडया** : ओ.......मी **छोटा जवान** नाही काय मी बंडया......... करमचंद........ डॅन्टडॅन्ड.

**नवले** : करमचंद हयाच्या बापाचं नाव.

**बंडया** : ओ....... नवलेकाका खेचताय काय माझी माझ्या बापाचं नाव करमचंद नाही काय मी करमचंद......... **क र म चं द**....

**नवरे** : तू करमचंद मग हा बंडया कोण?

**बंडया** : शीट.. तूम्हाला काय कळतच नाय. नवलेकाका हे पण शाळेत जात नव्हते काय?

**नवले** : बंडया तोंड बंद कर.

**बंडया** : ओ....... तोंड बंद केलं तर मी बोलणार कसा. मी बंडया मला आवडतो करमचंद आणि माझा बाप तात्या.....

**तात्या** : आलो, आलो, आलो,काय झालं बंडया?

**बंडया** : काय नाय तुमची ओळख करुन देत होतो हयांना .हा माझा बाप. (तात्यांच्या खांदयावर हात ठेऊन उभा राहतो.)

**नवले** : नवऱ्या कन्फयूज होऊ नकोस. कितीही विचार केलास तरी हया दोघात कोण कोणचा बाप आहे ते तुला कळणार नाही.

**तात्या** : नवऱ्या.., म्हणजे तुम्ही अमेरिकेचे नवरे.

**नवरे** : अमेरिकेचे नवरे. (हसतात) मी अमेरिकेशी लग्न नाय केलय.अहो नवरे हे माझं आडनाव आहे. हे खरे आहे की मी अमेरिकेतून आलोय.

**(बंडया व तात्या नवऱ्यांचे पाय पकडतात.)**

**नवरे** : अहो करताय काय?

**तात्या** : आधी आम्हाला आपलं म्हणा.

**बंडया** : आम्ही दोघं अमेरिकेला येणार तुमच्याबरोबर.

**नवले** : अमेरिकेला येणार.अरे तुम्हाला नेणार कोण.

**बंडया** : कोण म्हणजे,विमान चालवणारा. ट्रेन थोडी जाते अमेरिकेला नवलेकाका (हाताने जवळ बोलावतो व कानात बोलतो.) तुम्ही शाळेत गेला होतात काय हो?

**नवले** : काय म्हणालास?

**तात्या** : अहो नवले, आम्ही विमानानं जाणार.आम्ही श्रीमंत लोक आहोत.

**नवले** : बरं श्रीमंत आता घरी जा आपण उदया भेटूया.

**बंडया** : उदया कोणी बघितलाय. माझं काय नाय मी अजून तरूण हाय. आमचे तात्या उदया बघायच्या आतच गचकले तर.

**तात्या** : बरोबर बोलतोय बंडया. आम्ही दोघं तुम्हांला आमची ओळख करून देतो.

**बंडया** : (उडी मारून बसत) नमस्कार.

**तात्या** : हा एक करोड वीस लाख.

**नवरे** : काय?

**बंडया** : एक करोड वीस लाखाची पॉलिसी आहे माझ्या नावावर. पहीला हफ्ता भरलाय, पुढचा हफ्ता जमल्यास हफ्ता- हफ्त्यानं भरू.

**तात्या** : मी पंच्याहत्तर लाख.

**बंडया** : पंच्याहत्तर लाख रूपये कॅश आहेत हयांच्या अकाऊंटमध्ये. फिक्स डिपॉझिट.

**तात्या** : मजबूत व्याजावर आम्ही मजबूत खातो.

**बंडया** : आम्ही श्रीमंत लोक आहोत. आम्ही भरपूर पैसा उडवतो हे घरात उडवतात मी छम छम मध्ये.

**नवरे** : छम छम मध्ये?

**बंडया** : सुगंध हयांना छम छम माहीत नाय काय. आपण काल गेलेलो त्या छम छमचं नाव काय रे?

**सुगंध** : बंडया गप्प बैस.

**नवले** : गप्प बैस म्हणजे. सुगंध छम छम म्हणजे?आणि त्याला गप्प का बसायला सांगतोयस?

**सुगंध** : गप्पपणे बसायला सांगतोय त्याला ,काकांसमोर काहीही बोलतोय ना तो.

**बंडया** : ए काहीतरी काय बोलतो,काल पूजावर नाय आपण पाच हजार रुपये उडवले.

**नवले** : पूजावर पाच हजार रुपये उडवले?

**सुगंध** : अहो बाबा आमच्या मित्राकडे पूजा होती ना,तेव्हा आम्ही बंडयाने सगळयांना पार्टी दिली होती.

**नवरे** : पूजेला पार्टी.

**सुगंध** : त्याच काय माहीतेय काका. आमच्या मित्राने कोर्टात लग्न केलं. लग्नाची पूजा ठेवली होती काल, तेव्हा पूजा संपल्यावर लग्नाची पार्टी दिली होती.

**नवरे** : अच्छा, म्हणजे लग्नाची पार्टी होती तर.

**नवले** : म्हणजे तू काल पार्टी करून आलास.

**सुगंध** : पार्टी म्हणजे चायनीझच्या हॉटेलात गेलो होतो आम्ही, चायनीझ खायला.

**नवले** : चायनीझचं बिल पाच हजार.

**सुगंध** : ओ बाबा, आता डोकं खाऊ नका. उदया तुम्हाला पाच हजाराचा हिशेब देतो.

**तात्या** : सुगंध, नवल्यांना कशाला हिशेब देतोयस. आमचे पैसे गेले ना जाऊ देत. आम्ही श्रीमंत लोक आहोत.

**नवरे** : बरं श्रीमंत, आत मला सांगा. तुम्ही दोघं इथं काही खास कामासाठी आलात काय?

**तात्या** : हो,हो. तुम्हांलाच भेटायला आलोय आम्ही. हा माझा मुलगा. तुम्हांला सांगितलं ना एक करोड वीस लाख. सारखा बोलतो. आई पाहीजे, आई पाहीजे. तुमच्या अमेरीकेला आहे का हो एखादी आई?

**नवरे** : आई?

**तात्या** : आई म्हणजे बाई. हयाच्यासाठी आई.

**बंडया** : आणि तात्यांसाठी..

**तात्या** : पंच्याहत्तर लाख म्हणजे तात्या, म्हणजे मी. हा आता बोल.

**बंडया** : तात्यांसाठी एक सून. ( गाण्याच्या चालीत) सून सायबा सून, प्यार की धून. चिरते मी कांदा सख्या सोल तू लसून.

**नवरे** : तूमचा बंडया सिंगर आहे हो.

**तात्या** : सिंगरची मशीन पण आहे आमच्याकडे. तिने त्याच्यावर कपडे शिवले तरी चालतील, नाय शिवले तरी चालतील. आम्ही रेडीमेड आणू. आम्ही श्रीमंत लोक आहोत.

**बंडया** : तात्या, कळलं त्यांना आपण श्रीमंत लोक आहोत ते. आता लवकर लग्नाचं बोला.

**तात्या** : हो. आमच्या बंडयासाठी एक अमेरिकेचीच बघा. सारखा बोलतो, अमेरिकेचीच पाहीजे, अमेरिकेचीच पाहीजे हो की नाय बंडया (बंडया होकारार्थी मान हलवतो.) आई शिवाय सुकलाय पोरगा, आमच्या बंडयाला कराल काय हो अमेरिकेची आई.

**बंडया** : ओ तात्या आईची माया बस झाली,आता माझ्यापण लग्नाचं बोला लवकर.

**तात्या** : हो बोलतो,जमल्यास बंडयासाठी एखादी बायकोपण बघा.

**बंडया** : जमल्यास नाय बघाच, आणि एखादी पाहीजे असं काय नाय डझनभर भेटल्या तरी चालतील आम्ही श्रीमंत लोक आहोत.

**नवले** : हयांना बायका म्हणजे आंबे वाटले की काय, डझनभर घ्यायला? तात्या,बंडया तुम्ही या आता,मी सांगतो त्यांना तुमच्या लग्नाचं.

**बंडया** : तुम्ही काय पिऊन आहात काय?

**नवले** : बंडया......

**बंडया** : ओ काका ते पिऊन नाय,तो पिऊन निरोप पोचवीणारा इंग्लिश कळतच नाय हयांना. आम्ही डायरेकट बोलतो, अमेरिकेच्या काकांशी (उडी मारुन बसतो.) काका मला आशिर्वाद दया, आशिर्वादाबरोबर अमेरीकेवरुन दहा-बारा बायका होलसेल मध्ये पाठवा, नायतर मला अमेरिकेला घेऊन चला.माझी तिकीट मीच काढेन.पाहिजे तर तुमची पण. आम्ही श्रीमंत लोक आहोत ना.

**नवरे** : बंडया मी तुला आणि तात्यांना अमेरिकेला घेऊन जाईन हा आता तुम्हीं घरी जा.

**तात्या** : म्हणजे आमची दोघांची कामं होणार.

**नवरे** : होणार म्हणजे होणारच.अजून काही बाकी आहे का? (दरवाजा उघडून एक म्हातारा काठी टेकत आत येतो.)

**नाना** : माझं पण काम करा हो, बंडयाला आजी आणि तात्याला आई पाहिजेय हो. कोणी त्यांना एक आजी आणि आई देईल का हो.

**नवरे** : हे नटसम्राट कोण?

**तात्या** : तात्यांचे वडील नाना.

**नवरे** : लाख की करोड?

**बंडया** : त्यांची लाकडं पोचलेयत,एल.आय.सी वाले काय पीअरलेसवाले पण त्यांच्याकडे बघत नायत.तुम्हीपण बघू नका.

**नाना** : बंडया गाढवा माझे कान शाबूत आहेत अजून. अजूनदेखील तरणाबांड आहे मी, बिपाशासारख्या छप्पन पोरींना फिरवू शकतो.

**नवले** : ओ जेम्स बाँड, बिपाशा काय पोरगी वाटली तुम्हाला.

**नाना** : म्हणजे ती पोरगी नाही मग ती आहे तरी कोण?

**नवले** : नाना ती सामान्य पोरगी नाही , ती हिरोईन आहे हिरोईन.

**नाना** : हिरोईन असली तरी काय झालं आम्ही पण श्रीमंत लोक आहोत ना.

**बंडया** : नाना हया वयातपण तुम्ही प्रोपर्टीवर हकक दाखवताय.त्याग करायला शिका,ओ नवलेकाका हयांना शिकवा काहीतरी.

**नाना** : कुठल्या गाढवाच्या लेकाने तुला जन्माला घातला रे.

**बंडया** : ओ तात्या तुमचा बाप कोण?

**नाना** : ए तात्याचा बाप तर मीच.

**बंडया** : मग तुमच्याच लेकाने, तात्या लॉंक किया जाय ना.नंतर फिफटी फिफटी बोलायचं नाय काय.

**नवरे** : नाना बसा इथे बसा.

**नाना** : अं...हं...आता कसले बसताय,आता लग्नाच्या तयारीला लागलं पाहिजे.बघा हा लवकर एखादी अमेरिकेची मेम.

**नवले** : नाना तुमच्यासाठी सून आणि नातसून आपण अगदी कुरीयरने मागवू.

**नाना** : तुम्ही शाळेत गेला होतात काय हो?मी तात्यासाठी आई आणि बंडयासाठी आजी मागवण्याबददल बोलत होतो.

**नवरे** : नाना मी तिघांसाठी बायका मागवतो अमेरिकेवरुन.तुम्ही आता आराम करा.

**नाना** : बायका? ओ मला दुसऱ्याची बायको नकोय फ्रेश बघा फ्रेश.

**नवले** : स्पेलिंग माहितेय काय फ्रेशचं.

**नवरे** : नाना मी एकदम फ्रेशच मागवतो.मग तर ठीक.

**बंडया** : मला पण फ्रेश माल पाहीजे.(सगळे ओरडतात)

**सगळे** : बंडया...(काळोख)

**( प्रकाश . बाई रवा निवडत बसल्या आहेत चंद्रा येते )**

**चंद्रा** : द्या ते ताट इकडे. मी निवडते

**बाई** : अग तुझी बाकी तयारी झाली का ग... स्वयंपाक खोलीतली ?

**चंद्रा** : हो, उडदाची डाळ भिजत टाकली. कांदा , मिर्ची सगळ चिरून ठेवलय. आता फ़क्त हा रवा निवडून ठेवला की मग खरपूस भाजून मस्त उपमा बनवते बघा . दया ते ताट इकडे

**बाई** : अग राहू दे . निवडते मी .थोडाच राहिलाय आता

**चंद्रा** : तुम्ही बसा पाहू शांतपणे . ( ताट घेते व निवडू लागते )

**बाई** : आता दोघे आले ना फिरून की मग गरमगरम चहा, उपमा देउया त्याना. आणि हो, आज जेवणात श्रीखंड पुरीचा बेत करुया. चहा - नास्त्याच झाल्यावर पुर्यान्च्या तयारीला लाग. मुलांना आज गोड धोड खायला घालू.

**चंद्रा** : पण ते तर आज मुंबई फिरायला जाणार आहेत ना?

**बाई** : अग बाई, विसरलेच बघ मी. मग भरभर तयारीला लागुया आणि त्याना डबा भरून देउया ( चंद्रा हसते )

**चंद्रा** : नेतील का डब्बा ते ? अहो, अक्खा दिवस बाहेर फिरणार ते . हातातुन डब्बा कसा फिरवत बसतील. आणि, थंडगार जेवायची काय मज़ा येणार त्याना. दुपारला मस्त एसी होटेलात जाऊ दे त्याना. अन काही खाऊ दे जे पाहिजे ते. आणि रात्री फक्कड़ जेवण करू त्यांच्यासाठी. आता दुपार्च्याला अमेरिकेच्या साहेबाना जे आवडत ना , तेच करुया. कस?

**बाई** : (हसत) मग काय करुया दुपारच्या जेवणात ?

**चंद्रा** : आता साहेब आले ना की त्यानाच विचारुया ना? पण काही म्हणा बाईसाहेब . जरापन गर्व नाही त्याना पैशाचा नायतर एकेक जन. घरात नाही दाना आणि मला बाजीराव म्हणा.

**बाई** : (हसतात) कुठून आणातेस ग येवढ्या म्हणी? तोंड उघडल की तुझ्या आपल्या म्हणी चालू..

**चंद्रा** : (हसत) माझी म्हातारी म्हणायची. म्हणी शिवाय बोलायचीच नाही. दिवसा म्हणी आणि रात्रिच्याला गाणी . गावाकडच्या म्हणी आणि गावाकडची गाणी मस्त पाठ होती तिला. तेच ऐकत लहानाची मोठी झाली मी. म्हातारी गेली आणि मावशी घेउन आली मला तुमच्याकडे. खुप जिव होता तिचा माझ्यावर. पण इथ चाकरी करताना तुम्ही पण तिच्या सारखच प्रेम दिलत . आपल्या घरच्या मानसा सारखच वागवलत. एक खर खर सांगू? तुम्ही चांगली माणसं आहात ना, म्हनुनच तुमच्या जवळची माणसं पण इतकी भली आहेत. या घराला कधीच कुठल्या मेल्या काळ तोंड्याची नजर नको लागू दे.

**( सुगंध येतो)**

**सुगंध** : आई, माझ घड्याळ कुठे ते सापडत नाहीय केव्हापासून शोधतोय. सगळ घर शोधून काढलं.

**बाई** : अरे, ठेवल असशील इथेच कुठेतरी , जा तुझ्या खोलीतच असेल कुठेतरी

**सुगंध** : अग , असेल कुठेतरी काय ? मी शोधल ग सगळीकडे. या घड्याळामुळे उशीर होतोय सगळा . आज सन्नी आणि मोनाला मुंबई फिरवायला घेउन जायचय तर... या घड्याळाने सगळा घोळ घालून ठेवलाय.

**(मृदुगंधा येते)**

**मृदुगंधा** : हे घे. फ्रिजवर ठेवल होतस आणि सकाळ पासून अक्ख घर डोक्यावर घेतलस.

**सुगंध** : अरे हां, मीच सकाळी फ्रिजवर ठेवल होत. यार , माझ ना आजकाल डोकच ठिकाणावर नाहीय.

**(नवले व नवरे येतात )**

**नवरे** : कोणाच डोक ठिकाणावर नाहीय?

**नवले** : काहिपण  काय प्रश्न विचारतोयास. या घरात डोक्याच्या भागाचा प्रॉब्लम फ़क्त एकाच माणसाचा आहे. आणि ते महान पुरुष म्हणजे आमचे चिरंजीव.

**सुगंध** : हे तर वाटच बघत असतात. ज़रा चांस भेटला की घसरले माझ्यावर. ओ काका, तुम्हाला पण हे पहिल्यांदा असेच पकवायचे काय हो?

**नवले** : ह्याच्या तर आता. चन्द्रे, आतला झाड़ू घेउन ये जरा. कोणासमोर काय शब्द

वापरावेत याची पण गाढवाला अक्कल नाही. तुला जी काय मज़ा करायचे ना , ती करून घे. मग मी आहे आणि तू आहेस. वन बाय वन.

**सुगंध :** ज्यास्त डायलॉग मारू नका, दमाल. पैसे दया आम्ही फिरायला चाललोय .

**नवले :** आम्ही म्हणजे कोण कोण ?

**सुगंध :** आम्ही म्हणजे आम्ही. तुम्ही नाही. मी, सनी , मोना आणि मृदुगंधा.

**नवले :** अरे हो, कालच ठरल होत ना तुमच , मुंबई फिरायला जायच .

**सुगंध :** लवकर आठवल तुम्हाला ? वय वाढल्यावर होत अस कधी कधी

**नवले :** बाई, ह्या कार्ट्याला आवरा. नाहीतर मग अक्ख मुंबई दर्शन याच्या कानाखालीच काढेन .

**नवरे :** गप्प बस रे तू. किती बोलशील त्याला. सनी आणि मोना कुठे आहेत ? चल बोलाव त्याना आणि किती पैसे हवे आहेत? थांब , मी देतो .

**बंड्या :** नवलेकाका मी आलो, डेन्टडेन . कुणीही पैसे आणण्याची गरज नाहीय . माझ्याकडे भरपूर पैसे आहेत . आम्ही श्रीमंत लोक आहोत ना. सुगंध, काल रात्रीच मला टीप लागली होती की, तुमचा लोकांचा मुंबई फिरायचा प्लान आहे. आणि म्हणुनच मी मस्त टेक्सी घेउन आलोय. ती पण एसी . आम्ही श्रीमंत लोक आहोत ना.

**नवले :** ओ श्रीमंत, टेक्सीत ड्राईवर सोडून फ़क्त चौघानाच बसवतात. तू कुठे टपावर बसणार ?

**बंड्या :** ह्याना काय कळतच नाय बाबा . आपली वट आहे चार लोकात . टेक्सीवाल्याला कानपटवला. बोललो , चल मुंबई फिरायचेय . चार काय नी

पाच काय . आपल्याला काय फरक पडतोय . भेटला ट्राफिक वाला  की दिली शम्भराची पत्ती. मग चार काय नी पाच काय . सुगंध, ज्यास्त मोठा मेटर असेल तर मग आपण गाडीच विकत घेउया काय? आपल्याकड़े भरपूर पैसा आहे. ओ अमेरिकेचे काका, तुम्ही काय पण टेंशन घेण्याच काम नाही. जेव्हा आय यम हियर.. तेव्हा काय प्रॉब्लम देयर . (नवलेकडे जात ) नवलेकाका  , इंग्लिश होत ते, तुम्हाला नाही कळणार .

**नवले :** चन्द्रे, झाडू आण जरा.

**बंड्या :** नवलेकाका  , तुम्ही कचरा काढणार ?

**नवले :** चन्द्रे, झाडू आण.

**बंड्या :** चन्द्रेला सांगाना कचरा काढायला . बर नाही दिसत तुम्ही कचरा काढणार ते. काय  ओ अमेरिकेचे काका, बर दिसेल का हे?

**नवरे :** ( मोठ्याने हसतात ) नवल्या , शांत हो, शांत हो. ये आपण बसुया. वहिनी, दोन कप आमच्यासाठी गरमागरम चहा मिळेल का?

**बंड्या :** गरम असेल तर तीन कप . एक कप मीही पिईन म्हणतो .

**नवरे :** (  हसत  ) इकडे ये. बस इथे  माझ्या बाजुला आणि तीन कप नाही. सगळ्यानाच हवाय चहा

**चंद्रा :** ( चहा घेउन येते) थांबा, मी उपमा आणते.

**नवरे :** मला आता नको. आधी मस्त वॉश घेतो , मग खातो उपमा .

**बाई :** अहो पण , गरम गरम तयार होतोय ना. चल सुगंध, सनी आणि मोनाला बोलाव

पाहू. (सनी आणि मोना ) हे बघ आले . चला सगळयानी बसा इथे आणि चहा नास्ता करून घ्या.

**सुगंध :** ये आई, आधीच इतका उशीर झालाय. चल आम्ही जातो.

**बाई :** अरे पण, सगळयासाठीच बनवला आहे उपमा..

**नवरे :** डब्बा भरून दया त्याना. भूक लागली की खातील

**नवले :** अरे पण थंड होइल उपमा .

**नवरे :** अरे खातील गाडीत बसल्यावर . चंद्रा, आण डब्बा भरून. करू देत वन डे पिकनिक सेलिब्रेट ( चंद्रा जाते)

**बंड्या :** आयला काका काय डोक आहे तुमच. एकदम सरस. गाडीत बसलो की डाइरेक्ट उपमा खायची सुरुवात . त्या लंगड्या वाण्याकडून थर्माकोल्च्या प्लेट आणि प्लास्टिकचे चमचे घेतो ना मी. एस , वन डे पिकनिक. नास्ता गाडीत आणि लंच डाइरेक्ट.. टिकू जिच्या वाडीत. (सनी जवळ जात ) हाय सनी .

**सनी :** हाय

**बंड्या :** आर यु रेडी ?

**सनी :** एस, आय यम रेडी .

**बंड्या :** मग मी पण रेडी. बाय नवलेकाका. अब हम कुछ खायेंगे , पियेंगे तो गाडीमे बैठने के बाद. सुगंध सगळयाना टेक्सी मध्ये बसव. मी किचन मधे जाउन चंद्रा कडून डब्बा घेउन येतो उप्म्याचा . ( तो किचन मधे जात असतो, तेव्हा ती डब्बा भरून आणते व गरम डब्बा बंड्या च्या हातावर ठेवते. तिच्याकडे प्रेमाने पाहणार्या बंड्या च्या हाताला डब्याचा चटका लागतो व तो डब्बा उडवत उडवत ,डब्बा घेउन बाहर पळतो. सगळे हसतात )

**सुगंध :** बाय काका

**नवरे :** बाय बेटा

**सनी, मोना :** बाय डैड , बाय अंकल

**नवले, नवरे :** बाय बाय

**नवले :** सावकाश , साम्भाळून जा. दोन नग आहेत तुमच्या सोबत. त्यांच्यावर विश्वास ठेऊ नका जरा पण. ( सुगंध रागाने पाहतो व निघून जातो)

**मृदुगंधा :** बाबा, तुम्ही काळजी नका करू. मी आहे ना. आम्ही चार पाच वाजे पर्यंत परत येऊ .

**नवले :** तू आहेस म्हणून तर टेंशन नाही मला. नाहीतर सुगंध आणि बंड्या च्या जीवावर मी सनी, मोनाला पाठवलच नसत.

**मृदुगंधा :** (हसते. नवरेंच्या पाया पड़ते. ) चला येते मी काका. ( नवरे तिच्या मागोमाग दरवाजा पर्यंत जातात. दरवाज्या तुन सगळ्याना टाटा करतात.)

**नवरे :** नवल्या, माझ्या सनी साठी मृदुगंधाचा हात मागितला तर नाही म्हणणार नाहीस ना ? ( नवले उठून उभे राहतात. बाई व नवले एकमेकांकडे पाहतात. ) प्लीज , नाही म्हणू नका.

**नवले :** नवरया....,?

**नवरे :** भुरळ घातली रे मला या पोरीन. तिच्या रुपान लक्ष्मी च येइल माझा घरी. वहिनींनी ज्या संस्कारात वाढवलेय ना तिला . खरच, माझ्या घराच्या उजाड़ माळरानावर नंदनवन फुलवेल ती. माझा मुलगा आहे अमेरिकन , पण त्याला संस्काराचे धड़े नक्कीच गिरवायला शिकवेल माझी मृदुगंधा.

**नवले :** अरे पण ..

**नवरे :** माझ्या घरी मुलगी द्यायला नाही आवडणार का तुम्हाला ? आज मीच बाप आणि मीच आई बनून हात जोडून तुमची मुलगी मा्गतोय सुन म्हणून. प्रॉमिस करतो, तिला कधीच कुठल्या गोष्टीची कमी पडू देणार नाही. तळ हाताच्या फोड़ा प्रमाणे जपेन तिला.

**नवले :** ( नवरेंचा हात हातात घेत) माझा विश्वास आहे तुझ्यावर. पण तू गेली पंचवीस वर्ष अमेरिकेत राहिलास. या भारतातली मुलगी एडजेस्ट होइल तिथे.

**नवरे :** प्रत्येक भारतीय फ़क्त पैसाच कमवायला बाहेर गावी जातो रे. मग तो परदेशात पाच वर्ष राहिला काय किंवा पंचवीस वर्ष राहिला काय. मुलांच लग्न करताना तो इथच भारतातच परततो. राहण, खाण, पिणं, पैसा कमावण या सगळ्या गोष्टी चांगल्या वाटतात परदेशात . पण साता जन्माच नात जोडताना लागणारे संस्कार आणि आपलेपणा मिळविण्या साठी आपल्या माय देशातच यायची ओढ़ लागते. वाहिनी, आज ती जिवंत असती तर नक्कीच तिने तुमच्या समोर पदर पसरला असता पोरीसाठी.

**बाई :** भाउजी, अस नका हो म्हणू. तुमचा हक्क आहे तिच्यावर. पण सनी तयार होइल लग्नाला?

**नवरे :** अगदी एका पायावर. माझी मूल माझ्या शब्दाबाहेर नाहीत. मला खात्री आहे. माझ्या मुलाना माझा निर्णय मान्य असेल. मला फ़क्त तुमची दोघांची आणि मृदुगंधाची मान्यता हवी आहे. वाटल्यास तुम्ही तिच्याशी बोलून घ्या . हां, तिला जर हे लग्न मान्य नसेल तर मग मी जबरदस्ती नाही करणार . पण मला पूर्ण विश्वास आहे की ती तयार होइल या लग्नाला.

**नवले:** जस तू म्हणशील अगदी तसच होइल सगळ. बाई, चहा आणा जरा. हा आल्यापासून वेगवेगळे शॉक देतोय. कंठ भरून आला सगळा . थोडा चहानेच शेकवुन काढतो .

**बाई:** थांबा. चहा आणते.

**नवले :** नवरया, मला चिमटा काढ जरा

**नवरे :** काय..?

**नवले :** चिमटा काढ ना. (नवरे जोराने चिमटा काढ तात) आई ग , किती जोराने

काढलास चिमटा. मी चिमटा काढ म्हणालो होतो, चामडी काढायला नव्हती सांगितली , (नवरे हसतात)

**(प्रकाश . सगळे दोन्ही सोफ्यावर बसले आहेत. मूल सोफ्यामागे उभी आहेत. नाना मधोमध फेरया मारतायेत.)**

**नवले :** नाना, या बसा इथ. आपण बसून बोलूया. पाय दुखतिल तुमचे चालून चालून .

**नाना :** नवले...., तुम्हाला वाटतो तेव्हढा सोपा विषय नाही आहे हां . ( चंद्रेजवळ जात )

लग्नाची बोलणी अशी आरामात करायची नसतात. दोन जीवांचा प्रश्न असतो त्यात. खुप गंभीर विषय असतो लग्नाचा

**बंड्या :** ओ...., गौतम गंभीर backfoot वर खेळा जरा. जास्त पुढे पुढे जाऊ नका . नाहीतर मग दांडीच उड़ेल तुमची .

**तात्या :** बंड्या बरोबर बोलतोय . म्हातारयाने म्हातारपणी जास्त पुढे पुढे जाऊ नये.

**नाना :** म्हातारा तुझा बाप.

**बंड्या :** तुम्हालाच म्हणाले ते . ओ... अमेरिकेचे काका तुम्ही याना कशाला बोलावलत

हो? कोणाच्या पण लग्नाचा विषय निघाला की लगेच कोंब फूटायला लागतो याना . स्वताला एक लग्नाला झालेला नातू आहे हे देखिल विसरतात .

**तात्या :** नातू ना तू ? मग गप्प तिथे जा तू . मी आहे ना.

**नवरे :** तात्या, नाना, बंड्या, तिघानीही शांत व्हा पाहू . सगळे बसा मीच बोलतो आता.

तर .. आजच्या या मीटिंगच कारण सगळयांना माहितच आहे आणि या शुभ कार्याचा निर्णय घेताना नवरे फेमिली , नवले फेमिली आणि दोघांचेही आवडते शेजारी आमचे फेमिली फ्रेंड तात्या, नाना आणि बंड्या . आपण सगळे जमलो आहोत. तर आज सर्वांसमोर माझा असा प्रस्ताव आहे की, सनी आणि मृदुगंधा यांच लग्न व्हाव आणि माझ्या घरी मृदुगंधान लक्ष्मीच्या रुपाने येउन माझ्या घराची शोभा वाढवावी .

**बंड्या :** टाळया ( सगळे टाळया वाजवतात .)

**नवरे :** तर पहिला प्रश्न मी सनीला विचारतो. सो माय बॉय , तुला आमची मृदुगंधा पसंद आहे ना? मला माहितेय तू माझ्या शब्दा बाहेर नाहीस .

**नवले:** अरे, त्याला विचरतोयस, की तुझा निर्णय सांगतोयस. हे बघ सनी बेटा, तू याच काही ऐकू नकोस.तुझा नकार असेल तरी आम्हाला नाही वाईट वाटणार . लग्न म्हणजे आयुष्यभराची सोबत असते आणि कोणतेही शुभ कार्य मना विरुद्ध करू नये.

**सनी :** (नवलेना थांबवत ) अंकल, मी...मी.. i am ready for marriage . मी तयार आहे लग्नाला .

**( सगळे शांत . सुगंध आणि बंड्या मोठ्याने ओरडतात आणि शिट्या वाजवत नाचू लागतात )**

**सुगंध :** (गाणे गाऊ लागतो.) गोड गोजिरी , लाज लाजिरी , ताई तू होणार नवरी ...

**बंड्या :** फुला फुलांच्या बांधून माळा , मंडप घाला दारी... ( सगळे टाळया वाजवतात .)

**नवरे :** एक मिनिट , एक मिनिट . आता फ़क्त सनीच लग्नाला तयार झालाय. आता मृदुगंधा सांगेल की तिला हे लग्न मान्य आहे की नाही.

**नवले :** अरे , तिला काय विचारायच तिचा चेहराच बघ . किती लाजते बघ माझी पोरगी . **(ती लाजुन किचनमधे पळूंन जाते . सगळे हसतात .)**

**नवरे :** नवल्या, ती तुझी पोरगी होती . आता ती , माझी पोरगी आहे. काय नाना बरोबर बोलतोय ना मी?

**नाना :** you are wright . ( सगळे स्तब्ध )

**बंड्या :** तात्या , नाना English बोलतायत .

**तात्या :** आपले पैसे चोरून English शिकायला जातात की काय ?

**नाना :** चोर तुझा बाप

**बंड्या :** तुम्हालाच बोलतायत ते .

**नवरे :** ok , ok. नाना ही काय नविन भानगड आहे

**नाना :** i am going to english speaking course . अमेरिकेला यायच्या आधी इंग्लिश यायला पाहिजे की नाही मला. ( नवरे मोठ्याने हसतात. )

**नवरे :** you are absolutely wright नाना .

**तात्या :** बंड्या.. (जवळ बोलावतायत ) मला पण इंग्लिशच्या क्लासला जायचय.

**बंड्या :** आता काय करणार इंग्लिश शिकून ? (चन्द्रा जवळ जात ) आता सासरेबुवा व्हायच वय झालय तुमच. आता आम्हाला आशीर्वाद दया आणि अंग सोडा.

**तात्या :** आता सोडाच घालतो तुझ्या डोक्यात थांब.

**नवरे :** तात्या.., तात्या... एक मिनिट. वाहिनी मृदुगंधाला घेउन या जरा. या दोघाना इथे बसून बोलू दया . आपण जरा चककर  मारून येऊ आणि मग दोघाना एकत्रच काय तो निर्णय देऊ दे. नवरया.., चल आपण बेडरूम मधे जाऊंन बोलूया

**(बाई मृदुगंधाला आणून सोफ्यावर बसवतात .)**

**बंड्या :** मी तात्या आणि नानांना बाहेर घेउन जातो. सुगंध तू आणि बाकी सगळे आत जा

दुसरया खोलीत . (सनी उठतो .) ह्याला न काय कळतच नाही.  तू या सोफ्यावर बस. मृदुगंधा या  सोफ्यावर. आता आम्ही गेलो की लगेच काय ते ठरवा आणि आम्ही दहा मिनिटानी येणार गुड न्यूज़ ऐकायला . गुड न्यूज़ मिळाली की रात्री डाइरेक्ट छम छम  मधे काय सुगंध ? ( सगळे  सुगंध कड़े पाहतात .)

**सुगंध :** माझ्याकड़े काय पाहताय सगळे असे. तो बंड्याच काय ते बोलतोय . त्यालाच विचारा

**सगळे  :** छम छम

**बंड्या :** छम छम....? छम छमित म्हणजे चम् चमित खायला . गुड न्यूज़ मिळाली की

रात्री आपण होटेलात जाउन चम् चमित खायच . आजची पार्टी आम्ही देणार . आम्ही श्रीमंत लोक आहोत ना . (सगळे हसतात) हसताय काय ? चला आता बोलू दया त्याना थोडा वेळ . चल ग चन्द्रा, आपण जाउया.

**चंद्रा :** इश्य ... ( ती किचन मधे पळते. नाना व तात्या बंड्याला उचलून बाहर घेउन

जातात.)

**नवरे :** ( डोळा मारत ) so carry on . we are waiting for good news as soon as possible (सगळे हसून निघून जातात . सनी व मृदुगंधा दोघे एकमेकांकडे पाहत लाजत असतात.)

**सनी :** ( सनी उठून तिच्या जवळ जातो. तिचा हात हातात घेउन खाली बसतो. ती उभी राहते.) will you marry me ? (ती लाजते व मानेने हो म्हणते .नवले , नवरे बेडरूम मधून , सुगंध मोना चन्द्रा बाई किचन मधून तर बंड्या तात्या नाना दरवा जतुन ओरडत येतात.)

गुपचुप ,गुपचुप, गुपचुप, गुपचुप.... (गाणे सुरु होते. "दो दिल मिल रहे है . मगर चुपके चुपके " सगळे एकमेकांचे अभिनन्दन करू लागतात. **काळोख .**)

# <u>अंक दुसरा</u>

**(घर लग्न फुलांच्या माळांनी सजविलेलं दोन्ही बेडरूमही सजविलेले हॉलमध्ये नवरे व नवले चहा व नास्ता करीत असतात.)**

**नवले** : नवऱ्या.. साल्या.. यार माझा विश्वासच बसत नाहीए की काय घडलयं.मला वाटतय मी स्वप्नातचं आहे की काय.

**नवरे** : काय बोललास तू?

**नवले** : मी स्वप्नातचं आहे की काय.

**नवरे** : अं…हं…त्याच्या आधी.

**नवले** : माझा विश्वासच बसत नाहीए हे जे घडलयंना त्याच्यावर.

**नवरे** : त्याच्याही आधीचं विचातोय मी.

**नवले** : छया त्याच्या आधी कुठे काय बोललो मी.

**नवरे** : (ओरडत) मग नवऱ्या,साल्या कोण तुझा बाप बोलला.

**(बाई,चंद्रा, सुगंध,सनी, मृदूगंधा,व मोना सगळे धावत हॉलमध्ये येतात.)**

तू स्वत:ला समजतो कोण रे?
उठून उभा रहा.माइयासमोर बसण्याची लायकी आहे का तुझी.

**बाई** : भाऊजी

**नवरे** : प्लीज, कुणीही मध्ये बोलू नका. सारखं नवऱ्या, नवऱ्या, नवऱ्या. तुझ्या घरचा रामा गडी आहे का रे मी. तुझ्यासारखे शंभरजण माझ्या घरात ठेवायची ऐपत आहे माझी. बघतोयस काय तिरमिरल्यासारखा. उभा राहा. भलेभले तासनतास माझ्यासाठी ताटकळत उभे राहतात. आणि तू स्वत:ला काय समजतोस रे. नवऱ्या, नवऱ्या तुझा गुलाम आहे मी? बोल, गुलाम आहे तुझा? सारखा अपमान, सारखा अपमान, तुझ्या घरी थांबलोय म्हणून? तुला काय वाटतं, तू मला खायला घालतोयस. जाताना किती पैसे झाले असतील ते सांग. तोंडावर मारीन तुझ्या.

**मोना** : डॅडी..

**नवरे** : शट अप मोना, किप क्वाईट. खूप शांत ठेवलं स्वत:ला. आज बाहेर पडतायत ना ते शब्द नाहीत लाव्हा बाहेर पडतोय लाव्हा. मित्र हं.. रिस्पेक्टने बोल माझ्याशी रिस्पेक्टने. तुझ्या आणि माझ्या लिव्हींग स्टाईलमध्ये भरपूर

फरक आहे. जेवढा तुझा महीन्याचा खर्च आहे ना. तेवढा माझा एका तासाचा खर्च आहे. साल्या बोलतोय साल्या. तुझ्यासारख्या सुदामाच्या घरी कृष्ण आलाय कृष्ण. शिव्या देतोय सारखा. शिव्यांनी आदरातिथ्य करतोय. अरे नशीब समझ तुझं. तुझ्यासारख्याच्या मुलीला सून आणि मुलाला जावई करतोय मी. पण आता मी निर्णय घेतलाय. पंचवीस लाख देत असशील तरच ही लग्न होतील. नाहीतर उदया सकाळचीच विमानाची तिकीटं मला सहज मिळू शकतात.

**नवले** : (हात जोडून) पाया पडतो मी. लग्नाच्या पत्रिका पण वाटून झाल्यायत. लग्न मोडली तर काय तोंड दाखवू लोकांना. माझा संसारच उध्वस्त होईल.

**नवरे** : तुझा संसार सांभाळायचा ठेका नाही घेतलाय मी. पंचवीस लाख दे तरच ही लग्न होतील.

**नवले** : पण कुठून आणू मी पंचवीस लाख.

**नवरे** : ते मला काय विचारतोयस. घर विक नाहीतर स्वत:ला विक. पण पंचवीस लाख जोपर्यंत माझ्यासमोर येणार नाहीत तोपर्यंत मी हया लग्नांना संमती देणार नाही.

**नवले** : अरे पण तुझ्या संमतीनेच ही लग्नं ठरलेयत.

**नवरे** : तुमच्या बोल. तुमच्या संमतीने.

**नवले** : हो तुमच्या संमतीने. परवाचा मुहूर्त आहे आणि आज उदयामध्ये पंचवीस लाख. ठीक आहे, मी घेऊन येतो पंचवीस लाख. बाई, घराचे कागदपत्र काढून ठेवा. मी चिमणभाईंकडे जाऊन येतो. (नवले डोळे पुसत दरवाज्याच्या दिशेने जातात.)

**नवरे** : आणि येताना माझ्यासाठी एक पूना पानपण घेऊन ये. (नवले थंबतात.) ऐकलं नाहीस काय रे खरमाटया. ( नवले वळतात. नवरे मोठयाने हसतात.आणि नवल्यांची ॲक्टींग करत) बाई, घराचे कागदपत्र काढून ठेवा. मी चिमणभाईंकडे जाऊन येतो. (सगळयांना सांगत) सकाळ सकाळ चॅलेंज लावतोय माझ्याशी, मला कुणी रडवू शकत नाही.

**बाई** : म्हणजे तुम्ही..

**नवरे** : स्टेट लेवलला बेस्ट ॲक्टरची कितीतरी प्राइझेस मारलेयत मी. नवल्या जा, चिमणभाईंकडे जा आणि पंचवीस लाख घेऊन ये.

**नवले** : तुझ्या आता पंचवीस लाथाच घालतो थांब.. (नवले नवरेच्या मागे धावतात.दोघे थकून सोफ्यावर बसतात.)

**नवरे** : वहीनी, माझी काही एक चूक नाही बघा. हा बोलतो मी रडूच शकत नाही. मुलांच्या लग्नात पण रडणार नाही. अरे मी सांगितले थोडीच की लग्नात तू रडायला पाहीजेस. चॅलेंज मारतोय, मला कोण रडवूच शकत नाही. लग्नाच्या आधीच रडवला की नाही. जा आता एक पूना पान घेऊन ये.

**नवले** : नवऱ्या, साल्या.

**नवरे** : परत नवऱ्या आणि साल्या.

**नवले** : साल्या, तुझी लायकीच आहे ही.

**बाई** : तुम्ही दोघेही एकाच माळेचे मणी आहात बघा. लग्नाचं घर, एवढी कामं पडलेयत. आणि तुम्हां दोघांना गंमती आठवतायत.

**नवरे** : आता हा चॅलेंज लावतो त्यात माझी काय चूक?

**नवले** : चल आता, भरपूर बोललास. हॉलवर जायचय आणि काय रे मघाशी माझा बाप काढलास?

**नवरे** : स्वत: बाप काढतोस ते चालतं. आणि बाप काढला म्हणून तर सीन रंगला. आता तुला कळलं, आपल्या ग्रुपमध्ये मला मेनरोल का असायचा आणि तुला का बॅकस्टेजमध्ये ढकलायचे सगळे. साल्या कुठल्या गोष्टीचा सेन्सच नाही आहे तुला. नॉनसेन्स.

**सुगंध** : काका, काय जबरदस्त ॲक्टींग आहे हो तुमची. एकदम ए ग्रेडची.

**नवले** : मेल्या ॲडल्ट पिक्चर वाटला काय तुला तो ए ग्रेड दयायला.

**नवरे** : तुला ॲक्टींगचा सेन्स नाही ना. नॉनसेन्स माणसानं ॲक्टींगच्या बाबतीत बोलू नये कधी. माझा सुगंध खूप टॅलेंटेड मुलगा आहे कळलं. आईवर गेलाय तो, बापावर नाही गेलाय. नॉनसेन्स. चंद्रे कशी वाटली माझी ॲक्टींग.

**चंद्रा** : एकदम मस्त.

**नवरे** : मग एक ग्लास थंडगार पाणी मिळेल ना मला.

**चंद्रा** : थांबा, लगेच आणते पाणी. सरबत आणू बनवून. थंडगार लिंबू सरबत की कोकम सरबत.

**नवरे** : ग्लासभर थंडगार पाणी आणि कपभर गरम चहा. या मूर्खामूळे पूर्ण चहापण प्यायला मिळाला नाही.

**चंद्रा** : दोन मिनिटात घेऊन येते. **(काळोख)**

**(प्रकाश . चंद्रा घराची साफसफाई करत असते. तात्या गुपचुप मागून येऊन तिचा हात पकडतात.)**

**चंद्रा** : तात्या तुम्ही?

**तात्या** : हा मी, चल. (गाणे. चल भिगीनं चल गो चंद्रा.)

**चंद्रा** : तात्या, या वयात पण किती छान नाचता हो तुम्ही?

**तात्या** : या वयातसुध्दा सगळया गोष्टी छानच करतो मी. माझं वयच काय आहे. (बंडया येतो.)

**बंडया** : पोरग्याचं बाप बनायचं वय झालंय, तरी हयांचं वयच काय आहे. गाणी गातायत, नाचतायत. मला चॅलेंज, बंडयाला, करमचंदला चॅलेंज. चंद्रे कम हिअर. डॅन्टडँग. इथं उभी रहा. वन, टू, थ्री, फोर.( गाणे.. बांबू डालके रातभर कुटना....) आता बोल, तात्या की मी. कोण मस्त नाचतो.

**तात्या** : बंडया, मी बाप आहे तुझा.

**बंडया** : कशावरून. तुमच्याकडे काय प्रुफ हाय काय? (तात्या मानेने नाही म्हणतात.) मग, प्रेमात आणि युध्दात लढाई झालीच पाहीजे. बोल चंद्रे,तात्या की मी.

**तात्या** : बोल चंद्रे,या रणांगणाच्या रिंगणात आम्हां दोघांपैकी तुला कोण आवडला. (नाना येतात.)

**नाना** : दोघं नाही तिघं. (गाणे.. मधु इथे अन चंद्र तिथे..)

**चंद्रा** : नाना, या वयात पण तुम्ही?

**नाना** : झंडू का केसरी जीवन. च्यवनप्राश.

**बंडया** : तात्या, यांना कुणी पैसे दिले झंडू का केसरी जीवन घ्यायला.

**तात्या** : मी तर नाय दिले. मग चोरले की काय यांनी.

**नाना** : चोर तुझा बाप.

**बंडया** : तेच म्हणतायत ते. लपून गुपचूप पैसे चोरता. झंडूचं च्यवनप्राश खाता आणि आमच्या कॉम्पिटीशनला उतरता. तुम्हांला काय शरम वाटते की नाय. तुमच्या नातसुनेच्या वयाची आहे ती.

**तात्या** : बंडया. आईच्या वयाच्या बाईला असं बोलतोस तू. कायतरी लाज बाळग.

**नाना** : त्याला लाज बाळगायला सांगतोयस आणि तू काय करतोयस. देवानेच आमची नावं कशी एकमेकांमध्ये गुरफटून टाकलेयत. मधुनाना, चंद्रा. मधुचंद्र.

मधुनाना इथे.. अन चंद्रा तिथे.. नवल्यांच्या घरात.. अजब ही मधुचंद्राची रात..

**बंडया** : रात नाय नाना. दिवस आहे दिवस. चंद्रे आज काय तो फैसला झालाच पाहीजे. नाना, तात्या की मी.

**चंद्रा** : तुम्ही तिघेपण.

**तिघे** : तिघेपण?

**चंद्रा** : तिघेपण जा आता. मी विचार करून सांगते. आता सगळे देवळातून परततील.

**नाना** : परतले तर परतले. मी घाबरतो काय?

**बंडया** : आता घाबरलात की नाय घाबरलात फरक काय पडणार. तुमची सगळी लाकडं पोचलेयत.

**तात्या** : बंडया, तू पण माघार घे. बापासमोर मैदानात उभा ठाकणार तू.

**बंडया** : वेळ आली तर बापालाच मैदानात ठोकणार. सगळया इस्टेटीचा वारस आहे मी.

**तात्या** : इस्टेट..?

**नाना** : इस्टेट..?

**बंडया** : तुम्ही दोन म्हातारे माझ्यासमोर मैदानात उतरणार..?

**तात्या** : म्हातारा तुझा बाप.

**बंडया** : माहीतेय मला. म्हणूनच बोललो. दोघंपण निघा आता. चंद्रे, (गाणे. माँग लूँगा तूझे आसमाँसे...तू है मेरी किरन.)

**चंद्रा** : इश्श्य..(नाना छातीवर हात ठेवून खाली पडतात, दोघे त्यांना उचलून सोफ्यावर बसवतात. चंद्रा पाणी आणून पाजते.)

**बंडया** : इश्श्य..बोलली तर पडलात. पुढे काय कराल. कॉम्पिटीशनला उतरतायत. तात्या, तुम्ही पण पाय मागे घ्या. ( तात्या पाय मागे घेतात.) हा नाय कॉम्पिटीशन मधून.

**नाना** : अरे आधी मला हॉस्पिटलमध्ये न्या.

**तात्या** : बंडया, चल उचल हयांना.

**बंडया** : मी काय हमाल आहे काय. आधी बोला दोघांनी पाय मागे.

**तात्या** : अरे पण.

**बंडया** : मग मरा.

**तात्या** : पाय मागे.

**बंडया** : नाना तुमचा पाय.

**नाना** : मी राहीलो तर पाय राहील ना. मीच नाय राहीलो तर मागे काय घेऊ. उचल लवकर.

**बंडया** : देवा नानांना उचलतोय. तू पण हयांना लवकर उचल.**(काळोख)**

**(प्रकाश, बेल वाजते. चंद्रा दरवाजा उघडते. नवरे, नवले व बाई आत येतात.)**

**नवरे** : मुंबईत देवळात पण गर्दी. बिच्च्याऱ्या देवाला पण किती कंटाळा येत असेल नाही. प्रत्येकजण काही ना काही मागतच असतो. एकटा देव कुणाकुणाचं ऐकणार.

**बाई** : देव आहे तो. सगळयांचं म्हणणं बरोबर ऐकतो.

**नवले** : एवढया गोंधळात देव काय काय ऐकणार. ए नवऱ्या, तू काय मागितलस रे?

**नवरे** : मी. मी देवाला म्हटलं, शक्य झालं तर नवल्याला थोडी अक्कल दे. आणि त्याच्या तोंडाला लॉक लाव. सारखा आपला वचवच वचवच करून कान खातो.

**नवले** : मी वचवच करतो. मी कान खातो. मग तू काय करतोस रे. नुसतं तोंड हलवतोस.

**बाई** : झाली सुरूवात तुमची. तुम्ही दोघंजण एकत्र आल्यावर फक्त भांडायलाच पाहीजे काय? आता या वयात इतके भांडताय तर लहानपणी काय करत होता असाल.?

**नवरे** : लहानपणी. वहीनी, तुम्हांला सांगतो. लहानपणी आम्ही दोघं नाही भांडायचो. हयाला सगळे शेंबडया शेंबडया म्हणून चिडवायचे, तेव्हा मी त्यांच्याशी भांडायचो.

**नवले** : नवऱ्या साल्या चूप.

**नवरे** : चूप काय? तुझ्यासाठी किती मारामाऱ्या केल्या होत्या मी. विसरलास की काय? मी हयाच्यासाठी दुसऱ्यांशी मारामारी करायचो आणि हा शेंबडया तोंडात अंगठा घालून बघत बसायचा. शेंबडया..(सुगंध येतो.)

**सुगंध** : कोण शेंबडया..

**नवरे** : तुझा बाप. लहानपणी नवल्या शेंबडा होता.

**नवले** : नवऱ्या कशाला सारखी इज्जत काढतोयस.

**सुगंध** : बाबा, खरचं तुम्ही शेंबडया.. होतात. त्या मिठबावकरांच्या गण्यासारखे.

**नवले** : तूच होतास शेंबडया मिठबावकरांच्या गण्यासारखा.

**सुगंध** : तुमचा विषय चालू होता ना. मग माझ्यावर का आलात आता. आणि होतो मी शेंबडया. पण त्यात दोष कुणाचा होता. शेवटी प्रत्येक मुलामध्ये वडीलांच्या थोडयाफार सवयी येतातच ना. तुम्ही जर लहानपणी शेंबडे नसता तर मी पण नसतो शेंबडा लहानपणी. (नवरे मोठयाने हसतात.)

**नवरे** : काय पण उत्तर दिलंस. शाब्बास.

**नवले** : तो बापाला शेंबडा बोलतोय आणि तू त्याला शाबासकी देतोयस. तुला मी बोललो की वचावचा बोललेला दिसतो. हा बोलला की दिसत नाही की काय तुला.

**नवरे** : अरे जावई आहे माझा तो.

**नवले** : चढव. अजून डोक्यावर चढव. आणि मग आपल्या कर्माला रड. जसा मी हयाला जन्माला घालून रडतोय. काडीच्या कामाचा नाही. एवढा मोठा झाला पण..

**नवरे** : ए नवल्या, तो कुठल्या कामाचा आहे. हे तू कोण ठरवणारा. एवढी वर्ष सांभाळलास ना त्याला, आता माझा पोरगा आहे तो. मी इंडीयात नविन बिझनेस करायचं ठरवतोय. आपला सुगंध सांभाळेल तो बिझनेस.

**नवले** : नवऱ्या, इकडे ये जरा. तुझ्या तोंडाचा वास घेऊ दे मला.

**नवरे** : तोंडाचा वास .

**नवले** : दारू-बिरू नाय प्यायलास ना. बिझनेस डुबवायचा असेल तरच त्याला दे. घोडा झाला तरी मोठया माणसांसमोर बडबड करू नये, एवढी साधी गोष्ट ज्याला कळत नाही. त्याला तू बिझनेस काढून देणार. त्यापेक्षा सनीला दे बिझनेस काढून. ( सनी, मोना व मृदूगंधा येतात.)

**सनी** : कसला बिझनेस काका ?

**नवले** : अरे तुझे डॅडी सुगंधला इथे बिझनेस काढून देतायत. मी म्हटलं माकडाच्या हातात बिझनेस देऊन काय फायदा आहे काय ? त्यापेक्षा आपला सनी चांगला बिझनेस सांभाळेल.

**सनी** : नो वे काका, मी आणि इथे इंडीयात. मग तिकडचा बिझनेस कोण सांभाळणार.

**बाई** : बिझनेसच्या गोष्टी आता बाजूला ठेवा. घरात उदया लग्न आहे. लग्नाची गडबड घरात दिसायला पाहीजे, तर तुमचं आपलं हे बिझनेस, बिझनेस काय चाललय.

**(बंडया,तात्या, नाना व काही लोक ढोलकी घेऊन येतात.)**

**बंडया** : नवलेकाका मी आलो. डॅन्टडॅग.

**नवरे** : अरे बापरे, नवल्या. तुझ्या घरावर मोर्चा आलाय की काय ?

**तात्या** : लग्नाचं घर ना हे, मग गाणं बजावणं हवं की नको.

**नाना** : नाचणं पण पाहीजे की नको.

**बंडया** : म्हणून आम्ही या सगळयांना आमच्याबरोबर घेऊन आलो.आम्ही पैसे दिलेयत यांना नाच-गाण्याचे. आम्ही श्रीमंत लोक आहोत ना.

**नवरे** : नवल्या, काहीही बोल. तुला शेजार मात्र एकदम मस्त मिळाला बघ.

**बंडया** : मस्त म्हणजे, मी करमचंद हाय ना. कुठून कुठून हयांना शोधून आणलं माहीतेय काय? हा ढोलकीवाला तेली गल्लीतल्या सुताराला पोचवायला जात होता. बोललो कानफाट फोडीन. सुतार गेला. काय तंगड देणार तुला. देवून देवून त्याचा बेवडा भाव एक पावशेर देईल. माझ्याबरोबर चल बोललो. रात्री छमछम मध्येच बसवतो तुला.

**नवरे** : ही छमछम काय भानगड आहे रे.

**बंडया** : भानगड नाय काय.

**सुगंध** : अरे बंडया, एवढया लोकांना घेऊन आलायस ना. मग आपण बडबडत काय बसलोय. चला एन्जॉय करूया.

**बंडया** : अरे पण मी त्यांना सांगतोय छमछम म्हणजे..

**सुगंध** : गप्प बस. ( सगळयांकडे पाहत) शांत बस म्हटलं मी याला. तात्या, नाना बसा सगळयांनी. (सगळे बसतात.)

**बंडया** : ए..बसलात काय, उठा. पैसे कोणाकडून घेणार. माझ्याकडून ना. मग, मी सांगितलय काय बसायला. (सगळे उठतात.) सुगंध, हे लोक सारखे छमछम, छमछम करतायत. आज घेऊन जाऊया काय यांना छमछममध्ये.

**सुगंध** : गप्प बस, आता आपण सगळे अंताक्षरी खेळूया.

**बंडया** : हा अंताक्षरी खेळूया. क्लोज-अप अंताक्षरी खेळूया. ओ अमेरिकेचे काका आमच्याकडे पण आम्ही क्लोज-अपनेच दात घासतो. आम्ही श्रीमंत लोक आहोत ना.

**नाना** : बंडया.

**बंडया** : हयांच्याकडे बघू नका. हयांच्या तोंडात दातच नाहीत. हे क्लोज-अप कुठे लावणार.

**नाना** : बंडया. गाणी चालू कर लवकर.

**नवले** : हा चला. गाण्यांचा कार्यक्रम करूया. नवऱ्या तू पण किती वर्षांनी गाण्यांचा कार्यक्रम बघत असशील ना.

**बंडया** : ओ, हे बघायला मी एवढा पैसा ओततोय. सगळयांना नाचावं लागणार.

**नाना** : मी पण नाचणार.

**बंडया** : हे म्हातारं झंडू च्यवनप्राश खायला लागल्यापासून दिवसेंदिवस तरूणच होत चाललय. तात्या पॉलिसीचा खर्च वाढणार आता.

**नाना** : बंडया , सुरू कर.

**बंडया** : ओ, थांबा जरा. सेटींग करायला नको काय. सुगंध चल पार्टी करूया.

**सुगंध** : आता ?

**बंडया** : आता म्हणजे, आताच करायला पाहीजे. एक अमेरिकेच्या काकांची पार्टी एक नवले काकांची पार्टी.

**सुगंध** : ती पार्टी होय.

**बंडया** : मग तुला काय छमछमची पार्टी वाटली.

**नवले** : छमछम.

**बंडया** : छम्माछम्मा गाण्याने सुरूवात करायची. (सुगंधला) तुझ्या बापाचे कान जाम तिखट आहेत रे.

**नवरे** : चला लवकर. नवल्या, तिकडे समोर उभा रहा. वहीनी, सुगंध, मृदूगंधा तुम्ही इकडे या. सनी, मोना, चंद्रा तुम्ही नवल्याबरोबर. नाना तुम्ही इकडे या. तात्या तुम्ही नवल्याबरोबर.

**बंडया** : आणि मी ?

**नवरे** : तू कम्पेरींग कर.

**बंडया** : काय रिंपेरींग करू.

**नवले** : अरे तो माइक घेऊन दोन ग्रुपच्या मध्ये बडबड करतो ना.

**बंडया** : म्हणजे ताक धीना धीन. भाऊजी आदेश बांदेकर.. होम मिनिस्टर

**नवरे** : चला सगळयांनी रेडी रहा. वाजविणारे मधोमध. मस्त वाजवा हा.

**तात्या** : चांगलं नाय वाजवलं तर पैसेच देणार नाही कळलं.

**नाना** : हा, अंगात कसा नवा जोम आला पाहीजे.

**बंडया** : तात्या, नाना जागेवर बसा. नको तिथे जोम काढायला जाऊ नका. ए.. ढोलकी व्यवस्थित आहे ना. आणि गाण्यावर वाजवायची, गाण्याची नाय वाजवायची. सगळे रेडी.

**नाना** : लवकर खो दे, मला नाचू दे.

**नवले** : नाना तुम्हीच सुरू करा.

**नाना** : छम्मा छम्मा..बाजे रे..(गाणे)

**बंडया** : म.. छमछमचा शेवटचा शब्द म..

**नवले** : छमछम ?

**बंडया** : खाली बसा. आता ते बोलणार. बोलणार नाय गाणार आणि नाचणार.

**तात्या** : मै निकला गडडी लेकर ..( गाणे )

**बंडया** : दोन्ही म्हाताऱ्यांनी त्याचा जोर दाखविलेला आहे. तर आता आपल्यासमोर नवरेकाकाची टीम नाचगाणं दाखविणार. उथ दिल छोड आया. य..

**नवरे** : ये दोस्ती हम नही..(गाणे) .. तेरा साथ ना छोडेंगे.

**बंडया** : वा,वा. काय पण दोस्ती आहे. तेरा साथ ना छोडेंगे. नवलेकाका, हं..

**नवले** : गीत गाता हू में.. मुस्कूराता हू में..(गाणे)

**बंडया** : वा, क्या बात है नवलेकाका ! आता मला कळलंय तुमच्या मुस्कूराण्याचं राज काय आहे ते. मैने हसने का.. मुस्कूराता हू में.. नवलेकाका में..

**सुगंध** : मै शायर.. शायरी आ गई...(गाणे)

**बंडया** : आयला सुगंध, आज रात्री हेच बाजवायचं छमछममध्ये. छमछम आपलं. छम्मा छम्मा..पासून सुरूवात चांगली झाली ना. मगर ए.. शायरी आ गई. नवलेकाका.

**मोना** : ईटस द टाइम टू.. किसको. ..(गाणे)

**बंडया** : या डिस्को..म्हणजे छमछम ( सगळयांकडे पाहत) डिस्को.. .. किसको. क आला नवरेकाकाची टीम.

**मृदूगंधा** : कौन हो तुम जो..(गाणे)

**बंडया** : वा, जबरदस्त. काय पण गाणं शोधून काढलंय. है इसका जवाब. पहली नजर ..जाते हो. नवलेकाका. आता तुमची टीम. ह वरून बोला ह वरून.

**सनी** : हर घडी..कल हो ना हो. (गाणे)

**बंडया** : टाळया. ओ अमेरीकेचे काका. अमेरीकेला कल हो ना हो जाम हीट झालाय वाटतं. हया दोघांनी पण त्यातलीच गाणी गायली.

**नवरे** : तीन तीन वेळा पाहीला आम्ही तिघांनीपण. पण काय रे बंडया, तुला कुठलं गाणं कुठल्या पिक्चरचं आहे हे चांगलच माहीतेय.

**बंडया** : माहीत असायलाच पाहीजे. रोजच्यारोज पिक्चर बघतो मी. दुसरे काय कामधंदे आहेत मला. रोज चिक्कार पैसे उडवतो. आम्ही श्रीमंत लोक आहोत ना.

**नवरे** : अरे बंडया, सारखं सारखं सांगू नकोस की तुम्ही श्रीमंत आहात म्हणून, नाहीतर इनकम टॅक्सवाले यायचे घरात.

**तात्या** : आले तर आले. काय फरक पडतोय. आम्हांला प्रॉपर्टी मिळाली ना तेव्हाच त्यांचा हिस्सा त्यांना दिलाय.

**नवले** : बंडया, पुढे सुरू कर.

**बंडया** : हा, हा. पुढे. कुठलं गाणं झालं आता? हा . कल हो ना हो. हं आलां हं बोला आता.

**बाई** : हसते हसते .. कट जाये रस्ते .. (गाणे)

**बंडया** : क्या बात.. क्या बात.. क्या बात .. जिंदगी बदलती रहे.. come on Chandra.. come on..

**चंद्रा** : हुस्न के लाखों रंग.. ..देखोगे. (गाणे)

**बंडया** : हुस्न के लाखों रंग.. ..देखोगे.. कोई भी रंग दिखावो जानेमन... ( सगळे पाहतात. स्वताला सावरत )

**बंडया** : तुम्ही सगळयांनी गाणी गायली. आता मी. वाजवा रे. या...गंगू तारूण्य तुझं.. ..( चंद्रा गाते.)मला ठाऊक.. ..गंगाराम. (टाळया)

**नवरे** : वा, वा. बंडया काय नाचतोस तू आणि चंद्रा तू सुध्दा. तर बंडया तूच सांग आजच्या या अंताक्षरीमध्ये कोण जिंकलं ?

**बंडया** : मीच जिंकलो अंताक्षरीत.

**सारे** : तू..?

**सुगंध** : तू कसा काय जिंकलास ?

**बंडया** : आपण अंताक्षरी खेळत होतो. हो की नाय?

**सारे** : हो.

**बंडया** : आपण सगळे मराठी आहोत. हो की नाय?

**सारे** : हो.

**बंडया** : तुम्ही सगळयांनी हिंदीत गाणी गायली. हो की नाय?

**सारे** : हो.

**बंडया** : फक्त मी एकटयानेच मराठीतून गाणं गायलं हो की नाय?

**सारे** : हो.

**बंडया** : मराठीचा अभिमान मीच एकटयाने दाखविला. हो की नाय?

**सारे** : हो.

**बंडया** : म्हणूनच मीच जिंकलो. हो की नाय?

**सारे** : हो. ..ए असं कसं ? **(गोंधळ. काळोख )**

**(प्रकाश. नवरे व नवले हॉलमध्ये बसलेले आहेत.)**

**नवरे** : नवल्या, आज आपण दोघेही पोरांच्या जबाबदारीतून मुक्त झालो बघ. आता जगू दे त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे. उचलू देत आयुष्याच्या जबाबदाऱ्या.

**नवले** : नवऱ्या, कधी आपण लहानाचे मोठे झालो. कधी आपली लग्न झाली. एकमेकांच्या सोबत राहता राहता अचानक तू साता समुद्रा पार गेलास. तुझी, तुझ्या मैत्रीची आठवण झाली की बैचेन होऊन जायचो नुसता. इतक्या वर्षांनंतर इथं परतलास. इतकी वर्ष अमेरिकेसारख्या देशात राहून सुध्दा तुझ्या स्वभावात जराही बदल झाला नाही. हे तुझं टक्कल सोडलं तर जसा इथून गेलास तसाच परत आलास. वगावणार नसशील तर एक विचारू ?

**नवरे** : अरे विचार ना.

**नवले** : तुझ्यासारखा गर्भ श्रीमंत माणूस परत भारतात येतो, आणि माझ्यासारख्याच्या मुलाला जावई आणि मुलीला सून करून घेतो,

**नवरे** : म्हणजे तू या लग्नामुळे आनंदी नाहीस ?

**नवले** : तसं नाही रे मी खूप आनदी झालोय. पण या कृष्णाचा घरोबा या सुदामाशी.

**नवरे** : नवल्या, कोण कृष्णा आणि कोण सुदामा. अरे आयुष्यातली किती सुखः दु:ख एकत्र पाहीली आपण. वीस बावीस वर्ष आपण शरीराने वेगवेगळया देशात राहीलो, पण आपली मनं कधीच वेगळी झाली नाहीत. तुला आठवतय, आपण कॉलेजात असतानाच ठरवलं होतं. मला मुलगा आणि तुला मुलगी झाली तर त्यांचं लग्न करायचं.

**नवले** : हो, आणि मी विचारलं होतं, की आपल्या दोघांना पण मुलगेच किंवा मुलीच झाल्या तर ?

**नवरे** : हो. (हसतात.) पण देवाची इच्छाच होती म्हणून देवाने आपल्या दोघांनाही एक मुलगा आणि एक मुलगी दिली. अमेरिकेसारख्या स्वतंत्र विचाराच्या देशात वाढलेल्या माझ्या मुलांना तुझी मुलंच चांगले संस्कार देऊ शकतात. तू आणि वहीनीने निश्चितच मुलांना संस्कारात वाढवलं असणार. गायत्रीच्या मृत्युनंतर खूप विचार केला. दोन्ही मुलं खूप लहान होती. वाटायचं लग्न करावं दोघांनाही आईच्या मायेची गरज आहे. पण भिती सुध्दा वाटायची. जर सावत्र आईकडून माझ्या मुलांना त्रास झाला तर? म्हणून लग्नावर पाणी सोडलं. म्हटलं आई आणि बाप दोन्ही जबाबदाऱ्या आपणच पार पाडायच्या. सोमवारच्या फ्लाईटचं तिकीट मिळालंय. मी सोमवारी चाललोय. मृदूगंधाचा पासपोर्ट बनवायला दिलय. तिच्या ग्रीनकार्डची पण व्यवस्था करायचेय. तोपर्यंत सनी इथं राहीला तर चालेल ना.

**नवले** : नवऱ्या. चालेल ना काय विचारतोयस. हे घर तुझं नाही का ? आणि तू सोमवारीच.. एवढया वर्षांनंतर भेटलास आणि आता सोमवारीच..

**नवरे** : ए नवल्या. इकडे बघ. तुझ्या डोळयात पाणी. अरे वेडया महीना होऊन गेला मला इथं येऊन. अरे तिथे बिझनेस चौपट झाला असेल माझा. आणि मी येईन परत. तुम्ही सगळे या तिकडे, अख्खी अमेरिका फिरूया मग. आणि हो, सुगंधला जरा कमी बडबड आता. लग्न झालंय आता त्याचं. लवकरच त्याला त्याच्या जबाबदाऱ्या कळतील, तू कहीही चिंता करू नकोस. सारं काही व्यवस्थित होईल. ( हात जोडत) माझ्या मोनाला सांभाळून घे. मला माहीतेय अमेरीकेसारखं स्वातंत्र्य इथे नाहीए. ती सारं काही शिकेल हळूहळू. आईविना वाढलेय ना. माझ्या पोरीला तुझ्याकडे आई-बापाची माया मिळेल पण..

**नवले** : बरंय तुझं. मला सांगतोयस आणि तूच रडतोयसं. आणि हात वगैरे काय जोडतोयस. अरे मस्ती , भांडणं करता करता एवढे म्हातारे झालो आपण की एकमेकांचा आधार मागतोय.

**नवरे** : हो रे, आजपर्यंत भांडणांपलीकडे आपण कधी गेलोच नाही. खोटी खोटी भांडणं, मस्ती, गंमती-जंमती. अरे आपल्या पोरांची लग्न झाली ना म्हणून आपण दोघे अचानक स्वत:ला एवढे म्हातारे समजायला लागलो की काय ?

आता आपल्या जबाबदाऱ्या कमी झाल्या आणि पोरांच्या जबाबदाऱ्या वाढल्या. तू लवकर पासपोर्ट बनव तूझा. आपण दोघे यापुढे आपली लाईफ एन्जॉय करू.

**नवले** : लाईफ एन्जॉय करू. म्हणजे काय करू?

**नवरे** : तू अमेरिकेला आलास ना की तूला सांगतो लाईफ एन्जॉय करू. म्हणजे काय करू. अरे मस्त डिस्को मध्ये जाऊ. ड्रिंक्स करू. गोऱ्या गोऱ्या पोरींबरोबर धमाल करू नुसती.

**नवले** : अरे हेच करायच तर इथं पण आहेत ना डिस्को, लेडीज बार. छम्मा छम्मा..ए नवऱ्या. म्हणजे तो बंडया छमछम म्हणजे लेडीज बार बददल बोलत होता की काय?

**नवरे** : बहुतेक लेडीज बार म्हणजेच छमछम. एस..

**नवले** : म्हणजे बंडया सुगंधला घेऊन छमछममध्ये. सुगंध लेडीज बारमध्ये गेला होता.

**नवरे** : मग त्यात एवढं ओरडायला काय झालं. तरूण आहे तो. आपण म्हातारे छमछममध्ये जायचे प्लान बनवतो. मग तो गेला तर काय झालं.

**नवले** : अरे पण..

**नवरे** : तू गप रे. साल्या सुगंधच्या वयाचा होतास तेव्हा कसा पोरींच्या मागे वास काढत फिरायचास, सांगू काय सुगंधला ?

**नवले** : ए.. गप्प राहा. कशाला ओरडून सांगतोयस. कोणी ऐकलं तर त्या बंडयाने ऐकलं तर.

**नवरे** : नवल्या, आपण संध्याकाळी बंडयाच्या घरी जाऊया. बंडयाशी गप्पा मारता मारता त्याच्याकडून पाच-सहा छमछमचे ॲड्रेस काढू आणि रात्री छमछममध्ये.

**नवले** : अरे पण आपलं वय आहे काय हे छमछममध्ये जायचं ?

**नवरे** : साल्या पोरगी जवळ येऊन ढुंगण उडवायला लागली ना की बोलशील, आपलं हेच तर वय सगळया गोष्टी करायचं आहे ना. आणि तू स्वत:ला म्हातारा समजत असशील. मी बाबा अजूनही हिरव्या मनाचा आहे. यंग ब्लड आहे माझ्या नसानसात.

**नवले** : मग मी पण यंग आहे आतापासून. आज रात्री जायचं आपण दोघं छमछममध्ये. मोठयाने नाय ना बोललो. नाहीतर परत कुणी ऐकलं तर नको ते लफडं.

**नवरे** : साल्या, तू घाबरट तो घाबरटच राहीलास आयुष्यभर. आणि काय रे छमछममध्ये काय पिणार तू ? विस्की, रम की बियर.

**नवले** : लस्सी. लस्सी मिळेल ना तिथे.

**नवरे** : तू काय देवळात तीर्थप्रसादाचा लाभ घ्यायला चाललायस.

**नवले** : अरे मी कधी प्यायलो नाहीए ना. नुसत्या वासानंच मळमळल्यासारखं होतं मला.

**नवरे** : तूझी वास काढायची सवय गेली नाही अजून. अरे वास कशाला घ्यायचा. नाक बंद करून गटकन गिळायची. प्रत्येक पॅकबरोबर पाच वर्षांनी वय कमी होईल बघ तुझं.

**नवले** : अरे पण मी कधी घेतली नाय रे आजपर्यंत.तू काय, प्रॅक्टीस आहे तुला.

**नवरे** : प्रॅक्टीस? साल्या, दारू पिणं म्हणजे काय नेटमध्ये बॅटींग करणं वाटलं की काय तुला. प्रॅक्टीस बोलतोय. अरे कोणी किती कटटर बेवडा असला ना तरी, केव्हातरी त्याने पहील्यांदाच घेतलेली असते.

**नवले** : पण पहील्यांदाच घेतल्यावर मी पण कटटर बेवडा झालो तर ?

**नवरे** : साल्या, तुला दारू प्यायला सांगतोय की लोकसभेच्या इलेक्शनच्या सीटच डिस्कशन करतोय मी. सालं त्या लोकांना इलेक्शनच्या कमाचं जेवढं टेन्शन नसेल, एवढं तुला दारू प्यायचं टेन्शन. चल कोल्ड्रींक पी तू तिकडे.

**नवले** : पण कोल्ड्रींकने सर्दी झाली तर ?

**नवरे** : तू चल. गरम गरम चहा मागवतो छमछममध्ये तुझ्यासाठी. सर्दी झाली तर ? मठठ लेकाचा.

**(काळोख. सुगंधच्या बेडरुमचा लाईट ऑन होतो. मोना वेस्टर्न ड्रेसमध्ये बेडवर झोपुन पुस्तक वाचत असते. सुगंध सदरा लेंग्यामध्ये आत येतो.)**

**सुगंध** : **(घाम पुसतो) हा ऽऽ य मोना.**

**मोना** : **ओ हाय् सुगंध. ये ना बस.**

**सुगंध** : **हो बसतो ना. खूपच छान दिसतोय तुझा ड्रेस. आणि तू पण.**

मोना : सुगंध आधी ठरवय. ड्रेस छान दिसतोय की मी आणि काढ हा सदरा लेंगा. बुजगावण्यासारखा वाटतोयस.

सुगंध : काढू सदरा लेंगा (सुगंध उठतो) खरचं काढू.

मोना : खरंच म्हणजे (मोना उठून बसते) आणि एवढा वेळ कुठे होतास. मी एकटी बोअर झालेय माहितेय.

सुगंध : काय म्हणतेस काय? माझ्याविना बोअर झालीस.

मोना : तुझ्याविना नाही रे. एकटीच बसून बोअर झाले होते मी. पण तुला इतका उशीर का झाला.

सुगंध : ते सगळे मित्र आले होते ना. ते सुहागरात्री काय काय करायचं ते सांगत होते.

मोना : मित्र सांगत होते सुहागरात्री काय काय करायचं ते. तू कुठ सेमिनार नाही अटेंड केलंस मॅरिड लाइफचं.

सुगंध : न्युली मॅरिड लाइफच सेमिनार. कुठं होतं ते. आणि काय काय दाखवतात त्याच्याच? आपलं सांगतात त्याच्यात?

मोना : अमेरिकेला न्यूली मॅरिड कपल्ससाठी अशी सेमिनार होतात. सेक्सबद्दल सर्व काही सांगतात त्यात.

सुगंध : काय सांगतेस काय? काश मी पण अमेरिकेला जन्माला आलो असतो.

मोना : काही म्हणालास?

सुगंध : अं .... नाही. तू साडी नेसून नाही बसलीस.

मोना : साडी? अरे सुगंध लग्नाच्या वेळी साडी नेसली होती ना. तेव्हा मला असं वाटत होत की संपुर्ण अंगाला बँडेजच गुंडाळलय की काय?

सुगंध : साडीने बँडेजचा फील.

मोना : नाहीतर काय. आता कसं मोकळं मोकळं वाटतंय.

सुगंध : हो ना, मला पण मोकळं मोकळं वाटतंय. (तिच्याजवळ जातो.) मोना ......... मोना.

मोना : मोनाच्या पुढं पण काहीतरी बोल.

सुगंध : मला तुझा घुँघट वर करायचा होता. सुहागरात्रीची पहिली स्टेप ना ती.

मोना : सुहागरात्रीची पहिली स्टेप. किती स्टेपची असते सुहागरात्र.

सुगंध : आयला ते विचारायचं विसरलो. येऊ विचारुन. पटकन. तोपर्यंत तू घूँघट कर.

मोना : तू इथं बस आधी. हे घूँघट म्हणजे काय?

सुगंध : साडीचा पदर असतो ना. (ॲक्टींग करत) तो असा वर घेतला ना डोक्यावर की त्यात चेहरा लपला जातो. त्याला म्हणतात घूँघट.

मोना : पण चेहरा कशाला लपवायचा.

सुगंध : पहिली स्टेप. नवरा असतो ना तो बायकोचा घूँघट बाजूला करतो आणि तिला डोळे भरुन पाहतो.

मोना : डोळे भरुन पाहतो? का? आणि पाहतो मग घूँघट का ठेवायला सांगतो.

सुगंध : आयला, गुड क्वेश्चन? चेहरा जर पाहायचाच तर मग चेहऱ्यावर पडदा पाहिजेच कशाला. बरं झालं तू साडी नेसली नाहीस ते. बराच वेळ फुकट गेला असता. डायरेक्ट दोन-तीन स्टेप पुढं आलो ना. बरं आता पुढंचं विचारु?

मोना : पुढचं काय?

सुगंध : रागावणार नाहीस ना.

मोना : नाही. विचार तर खरं.

सुगंध : खरंच विचारतो. तू पण खरं खरं सांगशील ना.

मोना : हो सगळं खरं खरं सांगेन.

सुगंध : पण रागावणार नाहीस ना.

मोना : नाही सांगितल ना एकदा. विचार पटकन नाहीतर मी झोपते. गुड नाईट.

सुगंध : आयला सुहागरात्र बोंबलली. एक मिनिट मी विचारतोय ना. पण तू रागवू नको हा. तुला अमेरिकेला म्हणजे अमेरिकेला तुझा म्हणजे बघ तुझा अमेरिकेला.

मोना : अमेरिकेला माझा काय?

सुगंध : एखादा बॉयफ्रेंड वैगरे? त्याच्या मायला काय बोललो मी. सॉरी मोना ,सॉरी.

मोना : अरे सॉरी कशाबद्दल. होते ना. बरेच बॉयफ्रेंड माझे.

सुगंध : बरेच बॉयफ्रेंड?

मोना : हो का? तुझ्या गर्लफ्रेंड नव्हत्या इंडियात.

सुगंध : अं ......... हो ...... होत्या ना माझ्या गर्लफ्रेंड इंडियात. तू कुठे कुठे जायचीस त्यांच्याबरोबर फिरायला.

मोना : फिरायला म्हणजे आम्ही पिक्चरला जायचो. डिस्कोमध्ये जायचो.

सुगंध : बस .... बस, च्या मायला घाम फुटला मला. रुमाल कुठेय. हा मिळाला.

मोना : अरे तिथ प्रत्येक गोष्टीत स्वातंत्र्य आहे. फ्रिडम.

सुगंध : १९४७ ला भारत स्वातंत्र झाला. तरीसुद्धा आम्ही असुन पारतंत्र्यात आहोतच. मस्त मजा आहे अमेरिकेला. पाणी पिऊ मी?

मोना : हो पी ना (सुगंध बाजूच्या जारमधलं पाणी ग्लासामध्ये ओततो.) व संपूर्ण ग्लास तोंडाला लावून रिकामा करतो.)

सुगंध : आता कसं बरं वाटतयं.

मोना : तू किती मुली फिरवल्यास अं .... अं.

सुगंध : मी ................. मी आणि मुली ..............? म्हणजे बघ....

मोना : काय रे मुली नाय फिरवल्यास. बोलल्याने तर हिप्पी वाटतोस. झंपू बिंपू होतास कि काय?

सुगंध : झंपू.....? ये फिरवल्यातना मी पोरी एक ,दोन, तीन. चार, सात आठ फिरवल्या असतील.

मोना : बसं सात. आठचं, झंपूच आहेस बघ.

सुगंध : सात-आठ फिरवल्या तरी झंपू. तुझे किती बॉयफ्रेंड होते.

मोना : किती होते म्हणजे? ए तू अजून बॅवर्ड थिंकिंग का ठेवतोस रे?

सुगंध : बॅकवर्ड, मला तर फॉरवर्डलाच खेळायला आवडतं. मी घाबरत नाही. माझी थिंकींग पण फॉरवर्ड आहे. मी पुष्कळ पोरी फिरवल्या. मी काय राम वाटलो काय? मी कृष्ण आहे कृष्ण? संपूर्ण सुहागरात्रच बोंबलली माझी. साले सगळे मित्र सांगत होते. सुहागरात्री असं होतं. तसं होत. अरे मला इथं इंटरव्ह्यूला आल्यासारखं वाटतंय. (मोना हसत असते. दोन्ही हाताने त्याची कॉलर पकडून त्याला जवळ ओढते.)

मोना : शू, आत गडबड बंद. लाईट्स ऑफ कर.

सुगंध : काय? लाईट्स ऑफ. बॅटरी ऑन. कॉलर सोडशील तर उठून पटकन लाईट्स ऑफ करतो ना.

(मोना कॉलर सोडते. सुगंध जाऊन लाईट्स ऑफ करतो. मृदूगंधाच्या बेडरुमची लाईट्स ऑन होते. मृदूगंधा साडीमध्ये बसलेली असते. सनी आत येतो.)

सनी : मृदूगंधा. हे काय अजूनही साडी बसलेयस. क्वीक यार चेन्ज इट. काहीतरी मिडीज, मिनीज, वैगरे घाल ना.

मृदूगंधा : मीडिज, मिनिज तुम्ही हे ....

सनी : ए .... हे तूम्ही वैगरे बोलू नकोस हा. कॉल मी सनी. ए माझ्याकडे वाईनची बोटल आहे. घेऊया थोडीशी.

मृदूगंधा : सनी काय बोलतोयस तू, कळतयं का तुला.

सनी : ए कम ऑन बेबी, आता तू माझी वाईफ आहेस. तू अमेरिकेला येणार आहेस. माझ्याबरोबर. आता इथलं कल्चर विसरायचं आणि तिथल्या कल्चरप्रमाणे वागायचं. मृदूगंधा. शीट आधी तूझं नाव बदलायला पाहिजे. माहितेय. किती लांबलचक आणि कॉम्प्लिकेटेड नाव ठेवलंय तुझं.

मृदूगंधा : माझ्या साऱ्या फ्रेंडस् ना आवडायचं माझं नाव.

सनी : स्टूपीड फेलोज.

मृदूगंधा : काय म्हणालास?

सनी : अं .... काही नाही. मी तुला मॅडी बोलू.

मृदूगंधा : मॅडी हे काय नाव झालं?

सनी : काय खराबी आहे या नावात. मॅडी, हाक मारताना पण कसं पटकन तोंडावर येतं. सिगरेट पिणार?

मृदूगंधा : तू सिगरेट पण पितोस?

सनी : तू पिणार का? म्हणून विचारतोय.

मृदूगंधा : सनी तू ....

सनी : हे तू रागावलीस. सॉरी यार अरे यार अमेरिकेला कसं फ्री लाइफ जगलोय मी. आता मला काय माहिती इंडियामध्ये तुम्ही लोकं छोट्या छोट्या गोष्टी मनावर घेता ते?

मृदूगंधा : बायकोला वाईन घेयाला सांगतोस. सिगरेट प्यायला सांगतोस आणि तरीसुद्धा ह्या छोट्या छोट्या गोष्टी वाटतात तुला. मला तू आवडलास, मला वाटलं अमेरिकेत जन्म घेऊन, अमेरिकेत लहानाचा मोठा होऊन सुद्धा तू संपूर्ण भारतीयच आहेस.

सनी : (तिच्या खांद्यावर दोन्ही हात ठेवत.) ए, डार्लिंग, आज आपली सुहागरात्र आहे. ही तुझी लेक्चरबाजी बंद कर. कम ऑन लेट्स एन्जॉय अवर फर्स्ट नाईट.

मृदूगंधा : सनी प्लीज आय ॲम युवर वाईफ नॉट युवर कीप. अंडरस्टॅन्ड.

सनी : शट अप (सिगरेट पेटवतो) इंडियन थिंकींग. मी अमेरिकेत जन्माला आलो. अमेरिकेत वाढलो. मुक्स वातावरणात जगलो. म्हणून मी इतकं फ्रिली बोललो आणि फ्रि बोलतो. म्हणून मला तू वाईट ठरवलंस. आय ॲम यूवर वाइफ नॉट युवर कीप. कीप या शब्दाचं डेफिनेशन माहितेय तुला. आज आपली सुहागरात्र. अरे स्कूल-कॉलेजला प्रोफेसरनी जेवढे लेक्चर्स दिले नाहीत. तेवढे आताच्या आता दहा-बारा मिनिटात दिलेस ती. कीप? टेल मी. व्हॉट डू यू नो अबाऊट कीप.

मृदूगंधा : सनी, आय ॲम सॉरी. मला तुला दुखवायचं नव्हतं.

सनी : देन, देन व्हॉट. मजाक करीत होतीस माझ्याशी. प्लीज लिव्ह मी अलोन. झोप तू.

मृदूगंधा : सनी, ए .... अच्छा एक माणूस रागावलयं तर. पण आम्ही सॉरी म्हटलं ना. आणि माझं पहिल्यांदाच लग्न झालंय ना.

सनी : पहिल्यांदाच म्हणजे, म्हणजे तुला काय म्हणायचंय माझी आठ-दहा लग्न आणि दहा-बारा सुहागरात्री झाल्यात की काय?

मृदूगंधा : सो स्वीट. किती सुंदर दिसतोस रे रागावल्यावर. आता आजची रात्र संपूर्ण रागावण्यातच घालवणार की ....

सनी : की? की मिन्स ............ टेल मी की ........ व्हॉट इज नेक्स्ट टू की?

मृदूगंधा : की मिन्स की, चावी कपाटाची चावी सापडत नाहीए. मला कपडे बदलायचेत ना.

सनी : अच्छा, मला सतावतेस काय? थांब आता तुला बरोबरच करतो (तिला बेडवर पाडतो)

मृदूगंधा : सनी, अरे लाईट तर बंद कर.

सनी : ओ ............ एस (उठतो लाईट बंद करतो. काळोख.)

(प्रकाश. नवले बसलेले असतात)

बाई : झाली तयारी भावोजींची? अहो असं लहान मुलासारखं काय करताय? भावोजींना पण तुम्हाला सोडून जायचं. जीवावर आलय. उठा आधी त्यांना नास्ता करायला घेऊन या. चंद्रे, चल लवकर चहा नास्ता घेऊन ये. अहो जाताय ना ते एकटेच बेडरुममध्ये तयारी करताहेत. जा जरा त्यांना मदत करा. (मि.नवरे येतात.)

नवरे : अहे वहिनी, कसली मदत अहो झालेय माझी पॅकींग केव्हाचीच. आणि हा रड्या काय मला मदत करणा. साला स्वतः पण सारखा रडत असतो आणि मग मलापण रडवतो.

नवले : तुला आजच जायला पाहिजे होय? अजून चार दिवसांनी गेलास तर नाही चालणार काय?

नवरे : अरे अजून चार दिवसांनी काय फरक पडणार आहे. चार दिवसानंतरही मला तुला सोडून जावंस वाटणार नाही. की तूला मला सोडावसं वाटणार नाही. मग काय आयुष्यभर आपण एकत्रच राहायचं काय? अरे आता आपली मुलं मोठी झालेयत. लग्नपण झाली त्यांची. अरे आता म्हातारे झालो रे आपण. आता नातवंडाची तोंड पहायची आणि आनंदानं डोळे मिटायचे. आणि मी अमेरिकेला चाललोय. जग सोडून नाय चाललोय एवढ्यात.

नवले : मूर्खासारखं काहीतरी बडबडू नकोस. इतक्या वर्षांनी आलास. अजून तुला डोळे भरुन पाहिलं पण नाही आणि चाललास. आता पुन्हा कधी येशील कोणाला माहित?

नवरे : मी सांगतो नी. दिवाळीला येणार मी. फक्त सहा महिनेच बाकी आहेत. खूप धमाल करु दिवाळीला. बंड्या, तात्या, नाना सगळ्यांना बोलावू दिवाळी साजरी करायला. (बंड्या, तात्या, नाना येतात) अरे शंभर वर्ष आयुष्य आहे बघा तिघांचपण. मी आत्ताच नवल्याला बोललो, मी दिवाळीला परत येणार इथं. आपण सगळे मस्त दिवाळी साजरी करु. आणि माझ्या हे सुद्धा लक्षात आहे की मला काय काय शोधायचय अमेरिकेला. नानांना बायको, बंड्याला आई आणि तात्यांना सून तीहि अमेरिकन. पण पोसाल ना त्यांना. तसे पोसालच शेवटी तुम्ही श्रीमंत लोक आहात ना.

नाना : किती वाघ्याच्या काळजाचे तूम्ही. मन रडतयं मित्राला सोडून जाताना आणि तोंडानं विनोद करण्याचा प्रयत्न करताय. हे केस आणि दात असेच नाय उडालेयत.

तात्या : आम्हाला तूमची खूप आठवण येऊल बघा. आम्ही पण वाट बघू. कधी दिवाळी येईल ते.

**बंड्या** : (रडत) अमेरिकेचे काका, मी काय चुकीचं बिकीचं बोललो आसेन ना तर सॉरी. मला फालतू बडबड करायची सवय आहे ना.

**नवरे** : अरे बंड्या, तुझ्यामुळे तर मजा आली इथे. (चंद्रा चहा-नास्ता आणते) चंद्रे सगळ्यांसाठी चहा-नास्ता आणं, जाता-जाता एक मस्त चहा-नास्त्याची पार्टी. (सनी-मृदूगंधा, सुगंध-मोना बेडरुममधून येतात) या सगळे पुढे या, चला चहा-नास्ता घ्या. आणि आज कुणीही रडणार नाही. (चंद्रा चहा आणते.)

**नवरे** : बोस्टन टी पार्टी नंतर ही नवले टी पार्टी चियर्स. (सगळे कप उचलतात)

**सगळे** : चियर्स (चहा पितात)

**नवरे** : मोना, बेटा इकडे ये. अमेरिकेचं आणि इथलं लाइफ फार वेगळ आहे. सुगंध माझ्या पोरील सांभाळून घे. नवल्या, माझा जीव तुझ्याजवळ सोडून चाललोय. वहिनी संभाळा माझ्या पोरीला. मृदूगंधा लवकर ये सनीबरोबर मी वाट पाहतोय. चला, आता मला निघायला हवं. सनी माझी बॅग.

**सनी** : डॅडी, चला मी येतोय तुमच्याबरोबर एअरपोर्टला.

**सुगंध** : मी पण येतोय.

**बंड्या** : ओ अमेरिकेचे काका, मी पण येतोय. आपण टॅक्सी करुन जाऊया एअरपोर्टला. आम्ही श्रीमंत लोक आहोत ना. (सगळे हसतात)

**नवले** : परत येशील ना लवकर.

**नवरे** : अरे लवकर म्हणजे? हा गेला आणि हा आलो. अरे सहा महिने असे निघून जातील बघ.

**नवरे** : नवल्या, तुला आठवतय ? आपल्या लहानपणी आपल्या शेजारी खड्काळे आजोबा राहायचे

**नवले** : हो, रोज रात्री जेवल्यावर आपण त्यांच्याकडे गोष्टी ऐकायला जायचो

**नवरे** : रोज रात्री आपण त्यांच्याबरोबर एक गाणं पण म्हणायचो. आठवतंय तुला ते गाणं ? आजोबा घर विकून चालले होते तेव्हा आपण बोललो होतो ते गाणं.. आणि आपल्याला बिलगून हंबरडा फोडला होता त्यांनी .

**नवले** : आज तू चालला आहेस म्हणून ..... ( दोघांच्या डोळयांत पाणी येते. एकमेकांचे डोळे पुसत ...)

**दोघे :** गणपत, गणपत शिरपत खंडू
हाती पराती चौरया दंडू
एक एक दंड कल्याणी
माणिक मोती मल्याणी
मल्याणीचे निळे घोड़े
पहिले पाढे गणोबाचे
गणोबा हाती चित्रण काठी
तीच काठी अक्षर पाटी
एक एक अक्षर कोटि वाणी
तेच अक्षर पंडित जाणी

पड़ता पड़ता शितो हां
नाग नाजे वाजेता
मुंगे मुंगी मुंगातलो
त्याचा केला कापूसलोक
कापूसलोकाचा मोरया
मोर गेला चराया
विद्या आली भराया

भरे भरे तो शहाणा होई
मुर्ख खातो आया बाया
जोगेश्वरीच्या पाया पडो
हात पाय जोडोनी विद्या मागो
तीच विद्या खरी
गुरुजीनी मारली छड़ी
छड़ी बसे छम छम
विद्या येई घम घम
आम्हाला विद्या पावली
गुरुजींना विद्या भावली

**( दोघेही एकमेकांना मीठी मारून रडू लागतात . सारेजण भरल्या डोळयांनी टाळया वाजवू लागतात . काळोख . )**

# अर्पणपत्रिका

साहित्यकारांना साहित्यप्रेमींपर्यंत पोहोचवित अनेक रसिकांची साहित्यभुक भागविणार्या निस्वार्थ वृत्तीने कार्य करणार्या

**‘ ई साहित्य प्रतिष्ठान’**

या प्रकाशन संस्थेस
सदर पुस्तक
समर्पित.

संदीप शांताराम सुर्वे.
मुंबई.